# प्रकरण चौथे

# 'उत्खनन' कादंबरीचे अंतरंग

# प्रकरण चौथे

# 'उत्खनन' कादंबरीचे अंतरंग

**कथानक :-**

साहित्य म्हणजे मानवी मनाच्या मनोव्यापारात वसलेली एक सृष्टी असते. व्यक्ती आपल्या संवेदनशील मनात, निरीक्षणाच्या सूक्ष्म वलयात, अनुभवाच्या परिघात, सभोवताली घडणाऱ्या, भावलेल्या, अंत:करणात खोलवर आघात करणाऱ्या घटना, प्रसंग यांचेवर कल्पकतेचा साज चढवून शब्दरुपाने जिवंत रुप देतो. त्याला आपण साहित्य निर्मिती असे म्हणतो.

व्यक्तीप्रमाणे अनुभव बदलत असतो. प्रत्येकाची स्वत:कडे, समाजाकडे बघण्याची दृष्टी निराळी असते. पैकी काहीजण स्वत:चा आत्मशोध घेत सभोवतालच्या माणसांशी परस्परांशी असणाऱ्या संबंधाचा शोध स्वत:च्या स्वतंत्र बुध्दीने घेताना दिसतात. नैतिकता, धार्मिकता, संस्कार या व अशा अनेक गोष्टीकडे बघण्याचा प्रत्येकाचा वेगळा दृष्टिकोन असतो. मनाचा सतत कोंडमारा करुन, स्वत:शी प्रतारणा करुन आत्मबलिदान करण्यासारखे जीवन जगणे अनेकांना नैतिकतेचा भास निर्माण करुन देते. नेहमी मंदिरात जातो त्याला तो स्वत: व इतरही धार्मिक समजतात. पण मंदिरात जाण्यामागचा हेतू कोणता ? यावर त्याचे धार्मिकत्व ठरत असते हे त्याच्याबरोबर अनेकांना कळलेलेच नसते. तसेच स्वातंत्र्य, समता, स्त्रीवाद अशा अनेक गोष्टी अजूनही गुलदस्त्यात बंद आहेत.

'गौरी देशपांडे' यांच्या साहित्याचा अभ्यास करताना अनेक गोष्टीचा उलघडा होतो. समजूत वेगळी व समजून घेणे वेगळे. त्यांच्या कथानकातील व्यक्ती सर्वसामान्यांना रोजच्या जीवनप्रवासात भेटणाऱ्या असतील, असे वाटत नसले तरी त्या असूच शकणार नाहीत असेही म्हणता येणार नाही. आपण अनेक कथानकामध्ये बघतो की, त्यातील पात्रे ही एकतर अगदी सोज्वळ, फक्त चांगली म्हणता येतील अशीच असतात. पण थोडा विचार केला तर आपल्या असे लक्षात येते की व्यक्ती संपूर्ण चांगली किंवा संपूर्ण वाईट असते असे नाही. मग प्रश्न असा पडतो की जीवन जगत असताना आपण कोणाशी नाते, मैत्री ठेवावी, वाढवावी ? खरे तर येथे वेळ येते आत्मपरीक्षणाची. व्यक्ती म्हणून स्वत:कडे बघताना आपल्यातही काही चांगले तसे काही वाईट ही गुण असणारच जसे इतरांमध्ये असतात. तेव्हा एकमेकांना गुणदोषांसह स्वीकारणे हा स्थायी भाव ठेवून जेव्हा आपण चालू तेव्हा जीवन अधिकतर सुखकर होईल .

गौरी देशपांडे यांच्या 'उत्खनन' या कादंबरीच्या कथानकाचा अभ्यास करताना आपल्या हे लक्षात येते की, जीवन हे एक 'उत्खनन' असावे का ? सतत शोध, आत्मशोध ! या कादंबरीतील नायिका ही

पुरातत्वशास्त्राची प्रोफेसर आहे. 'उत्खनन' हा तिच्या व्यवसायातील भाग आहे. त्या उत्खननाची तिच्या मनाला, बुध्दिला इतकी सवय झाली आहे, की ती जीवनातही सतत उत्खनन करत राहते असे वाटते. स्वत:च्या स्वभावातील, नात्यातील परस्पर संबंधाचे उत्खनन तिच्या मनात नेहमी चालू असते.

'गौरी देशपांडे' यांची 'उत्खनन' ही कादंबरी लघु कादंबरी आहे. त्यांची ही शेवटची कादंबरी आहे. त्यामुळे या कादंबरीत अनुभवाच्या परिपक्वतेतून प्रगल्भता आलेली आहे, असे जाणवते. समाजाची व्यक्तीकडे व व्यक्तीची समाजाकडे बघण्याची दृष्टी ही कशी असते व ती कशी असावी ? याचे भान त्यांच्या या कादंबरीतून येते. २१ व्या शतकात वावरतानाही स्त्री कडे माणूस म्हणून किती जण बघतात. माणूस म्हटले की चुका होणार. तेव्हा स्त्री जर माणूस असेल तर तिच्याकडूनही जाणते–अजाणतेपणी चुका होणार हे समाज मान्य करतो का ? म्हणजे अजूनही समाज स्त्रीकडे माणूस म्हणून बघताना दिसत नाही.

त्यांची 'उत्खनन' ही कादंबरी अशाच अनेक गोष्टीं सांगून जाते. त्यांची ही कादंबरी प्रथम पुरुषी निवेदन पध्दतीत मोडते. नायिका स्वत: निवेदन करते आहे. 'दुनिया' हे जगा वेगळे नाव लाभलेल्या नायिकेला जीवनही चारचौघीपेक्षा वेगळेच लाभलेले आहे. १८–१९ वर्षाची नायिका कॉलेजमध्ये असताना अनंताच्या प्रेमात पडते. त्याचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगळाच असतो. तोच हिला पटतो. त्याच्या पदार्पणाने तिच्या जीवनात मात्र खूपच बदल होतो. तिला लग्नाआधी दिवस जातात. अभ्यासात दुर्लक्ष होते व अनंता निघून जातो. हे सारे अकल्पित असल्यामुळे दुनिया घाबरुन जाते. स्वत:च्या जीवनाची, जबाबदारीची पूर्ण कल्पना यायच्या आधीच तिचेवर आणखी एका जीवाची पडलेली जबाबदारी तिला पटणारी व पेलवणारी नसते. या साऱ्या घटनांची चाहूल तिच्या आईच्या जाणकार मनाला लागलेली असते. तिने वडिलांनाही याची समज दिलेली असते. ते तिघे मिळून तिच्या व तिच्या होणाऱ्या बाळाच्या जीवनाचा निर्णय घेतात. हा निर्णय समाज मनाच्या विरोधी असतो. म्हणून धाडसाचा ठरतो. तिचा एकटीचा हा प्रश्न नसतो. चूक तिच्या हातून घडलेली असली तरी तिने एकटीने स्वीकारुन नाकारुन चालणारे नव्हते. आई–वडिलांच्या सहकार्याशिवाय तिला झेपणारही नव्हते म्हणूनच सुरवातीलाच जेव्हा तिचा नवरा दयाळ घर विकूया असे अगदी सहज बोलतो तेव्हा तिच्या मनात उत्खनन सुरु होते. घर म्हणजे केवळ चार भिंती किंवा त्यातील वस्तू नव्हेत, तर त्या भिंतींना किंवा वस्तूंना चैतन्य देणारी माणसे असे ती म्हणते. तिला आई–वडील अपवादात्मक मिळालेले असतात. मुलीची झालेली चूक ही सर्वांनी स्वीकारायची, त्यांची जबाबदारी ते दोघेही घेतात. येथे मुलीच्या मनाचा ते माणूस नात्याने विचार करतात असे दिसते. प्रत्येक प्रश्नाला उत्तर सापडते तसे चुकाकडे भयानक दृष्टीने बघून संकटाकडे

पाठ फिरवून जीवनाचा प्रवास सुरु ठेवता येत नाही. हे ओळखून येणाऱ्या प्रसंगांचा स्वीकार करुन त्यांच्याशी दोन हात करणे याला जीवन म्हणावे असा जीवनाचा दृष्टिकोन गौरीताईंनी मांडलेला दिसतो.

अनंता निघून गेल्याचे दु:ख ती उराशी कवटाळून बसलेली दिसत नाही किंवा त्याला शिव्या देत, त्याचा रागराग करतानाही दिसत नाही. उलट जबाबदारी टाळण्यासाठी नव्हे तर 'स्व' त्वाला फुटलेला घुमारा टाळण्यासाठी तो गेला अशा प्रामाणिक दृष्टीने त्याच्याकडे बघते. हे मानत असताना तिला आपल्या आई-वडिलांच्या त्यागाचेही मोल वाटते. त्यांच्यामुळेच आज मी व मणी आहोत हे सत्य ती सतत तेवत ठेवते.

पुरातत्वशास्त्राच्या संशोधनाचा अभ्यासासाठी परदेशात जाते. तिथे तिला भारतातीलच एक मित्र भेटतो. तो न्युरोसर्जन असतो दयाळ त्याचे नाव. त्यांचे विचार एकमेकांना पटतात. तो लग्नाचे विचारतो. दुनिया पटकन होकार न देता आपली कहाणी सांगते व त्याची अधिकच आपुलकी मिळवते. पण लग्न करण्याआधी आई-बापू, मणी, एवढेच काय जमना-सखाराम, ही घरातील नोकर माणसे तसेच भटक्या जंब्या, मोजा व शंभू या कुत्र्या-मांजरांनाही तू आवडला पाहिजेस असे सांगते. येथे असे दिसते की, ही नायिका काही बाबतीत आपले स्वातंत्र्य, स्वतंत्र मते जपणारी असली तरी घर-कुटुंब या घटकाकडेही आत्मियतेने बघते. माझ्या असण्यामागे अनेकांचे ऋण आहे हा कृतज्ञ भाव त्यातून व्यक्त होतो. व हा तर निखळ मानवतेचाच स्वभावधर्म आहे. दयाळला स्वत:चे कुटुंब नसते. त्याचे आई-वडील वारलेले असतात. दुनियाच्या आई-बापूंना, मणीला, कुत्र्या-मांजरांना, नोकर-माणसांना व तिच्या मित्र-मैत्रिणींना तो अगदी मनापासून स्वीकारतो हा त्याचा मोठेपणा. तिच्या आयुष्यात मणी तर तिच्यापेक्षा इतरांचीच जास्त असते. पूर्वी आईची अधिक आता दयाळची.

त्याच्या या चौकोनी कुटुंबात तिच्या मैत्रिणींच्या अभयाच्या कुटुंबाची भर घालून गौरीताईंनी कादंबरीत रस भरला आहे. मी, माझे, मला या वलयाखेरीज आपली नजर इतरत्र जात नाही. अशा या युगात निखळ निरागस मित्र भेटणे अशक्यच. सुख-दु:खासह गुण-दोषांसकट एकमेकांना आपले म्हणणारे लोक दुर्मिळ वाटू लागले आहेत. अशा परिस्थितीत अभयाची तीन मुले व ती दोघे असे त्यांचे कुटुंब व दुनियाचे कुटुंब इतके एकमेकांच्या मना-विचारानी जवळचे वाटते की अनेकांनी मित्र या शब्दांचा हेवा करावा, खरे तर मित्रत्वाच्या नात्यात प्रेम-विश्वास, निर्भेळता, निरपेक्षता असायला हवी तितकी त्या दोन कुटुंबात ओतप्रोत भरलेली दिसते. त्यामुळे अनेकांना पडणारा प्रश्न आपल्याही

मनावर काही काळ प्रश्नचिन्ह उभे करतो. अशी माणसे गौरी ताईंना कुठे भेटली असतील? पण जे पेरावे ते उगवते तसे द्यावे तसे काही प्रमाणात तरी मिळतेच यावर विश्वास ठेवायला हवा. आपण एखाद्याला, विश्वासाने आपले म्हटले, प्रेमाने जवळ केले, मायेची उब दिली तर कुत्री मांजरेही जीव लावतात मग माणसांना तर या भावनाची भूक असते.

मणी ही तिची मुलगी दयाळसारखीच न्युरोसर्जन होते. दोघांचे मोठे हॉस्पिटल सुरु करतात. जब्बारशी तिचे लग्न होते. पण तो अगदी तिच्या विचारांपेक्षा वेगळ्या विचारांचा असतो. त्याचे कुटुंब पूर्णपणे मनीच्या कुटुंबापेक्षा निराळे असते. स्त्रीने किंवा कोणत्याही माणसाने फक्त घर-संसार, मुले, एवढेच जीवनाचे ध्येय मानून त्याचाच ध्यास घ्यावा या विचारापासून ते कोसो दूर असते. ती अत्यंत बुध्दिवादी, जीवनाकडे उदात्त दृष्टीने बघणारी असते.

या कादंबरीतील माणसे जीवनाचे निराळे भान आलेली, जीवनाकडे वेगळ्या दृष्टीने बघणारी वाटतात. त्यातच आणखी एका प्रसंगाची भर. एके दिवशी दुनियाच्या हातात एक पत्र मणी देते. ते वाचून दुनिया भूतकाळात जाते. बराच वेळ स्तब्ध होते. ते पत्र असते अनंताचे. ते वाचून ती सुन्न होते. जीवनाच्या संध्याकाळच्या वेळी तो तिला भेटण्याची इच्छा व्यक्त करतो. त्याला ब्रेनट्युमर झालेला असतो. शेवटचे काही दिवस, काही घटका घालवणयासाठी त्याला आठवण झाली ती दुनियाची. दुनियाभर फिरुन शेवटी तो त्याला गवसून न लाभलेल्या अशा दुनियेत येण्याचे ठरवतो. तेही त्या साऱ्यांची इच्छा असेल तर. हे वाचून काहीही उलट सुलट चर्चा न होता मणी व दयाळ त्याला बोलावून घेऊन त्याच्यावर उपचार करुन शक्यतो त्याला बरे करण्याचा मानस बोलून दाखवतात. तो आल्यानंतर त्याचे मोकळेपणाने स्वागत व स्वीकार करतात. कुठेही उपकाराची, औपचारिकतेची, अपुरेपणाची जाणीव त्याला होऊ देत नाहीत. अभयाकडीलही सर्वजण त्याला स्वीकारतात. अर्णवशी तर त्याची चांगली मैत्री होते. सुरवातीलाच दुनिया त्याच्या विरोधी बोलत नाही. जेव्हा तो जबाबदारी टाळून निघून गेल्याचे कळते तेव्हाही ती त्याचा राग करत नाही. लेखिकेने या आताच्या प्रसंगाचे रोपण जणू तेव्हाच केल्याचे भासते. कधीकाळी जर तो भेटला तर एक मित्र म्हणून एका कप्प्यात त्याची असणारी जागा तिने अबाधित ठेवली होती. असे दिसते. त्यामुळे आता या वयात, अशा अवस्थेत तो आल्याने व तिने त्याचे स्वागत केल्याचे वाचकांना विसंगत वाटत नाही. शेवटी त्याच्या जीवनाचा म्हणजे सर्जरी करायचा निर्णय तो तिच्यावरच सोपवतो. सर्वानुमते त्याची सर्जरी करुन शक्यतो प्रयत्नानी त्याला आणखी १० वर्षांचे तरी जीवनदान द्यायचं ठरते. मणी, दयाळ यांच्यातील माणूसकी आपल्यातील कुशलता पणाला लावून त्याला वाचवणार असतात.

गौरी ताईच्या कादंबरीतील व्यक्ती कामावरची निष्ठा, प्रेम इत्यादी मूल्ये जपताना दिसतात. उत्खननमधील पात्रे स्वत:चे मत जपताना इतरांच्या मताचा अनादर करताना दिसत नाहीत. गौरी देशपांडे यांचा मतप्रवाह, 'स्वातंत्र्य' या संकल्पनेला महत्व देणारा आहे. पण "स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे तर स्वातंत्र्य म्हणजे जबाबदारी. चुका करण्याचे स्वातंत्र्य माणसाला असले पाहिजे पण त्याच बरोबर त्या चुकांची जबाबदारीही त्याने पेलली पाहिजे" असे मत नीलिमा पालवणकर (ढाणे) यांनी आपल्या मिळून साऱ्याजणीतील गौरी देशपांडे यांच्या विशेष अंकातील लेखात मांडले आहे.

साहित्य निर्मितीमागील अनेकांचे कोणते का हेतू असेनात. पण प्रत्येक चिंतनशील लेखक आपल्याला भावलेले जीवन भाष्य सहजपणे वाचक मनावर ठसवत असतो. उत्खनन मध्येही गौरी ताईंचे असे जीवन भाष्य आढळते. उदा. मरणा विषयीचा त्यांचा आधुनिक तर्काधिष्ठित दृष्टिकोन त्यांनी त्यांच्या आई-बापूंच्या स्वेच्छामरणातून नकळत वाचकांपर्यंत पोहोचवला आहे. प्रयत्नांची शिकस्त करुनही जगणे अशक्य असेल किंवा ते असह्य असेल तेव्हा उपचार बंद करुन मानाने, तन-मनाने हाल न करता मरण स्वीकारणे या गोष्टीला सर्वांची अनुमती हा जीवनभाष्यातील नवीनता त्यांनी मांडलेली आहे.

उत्खनन ही लहान कादंबरी, विषय लहान वाटला तरी त्यातून व्यक्त होणारा आशय मोठा असल्यामुळे मनाचा ठाव घेतो. प्रथमदर्शी सामान्य वाटणारी माणसे आपले असामान्यत्व प्रकट करु लागतात. तेव्हा त्या कादंबरीचे मूल्य अमोल होऊन जाते. उत्खनन ही न संपणारी बाब आहे. ते नेहमी सतत सुरु राहणारी गोष्ट आहे. तसेच मनात अनेक गोष्टी, घटना, प्रसंग यांचे एकातून दुसऱ्यात सतत उत्खनन सुरु असते. हे जणू गौरी देशपांडे या कादंबरीतून सुचित करु इच्छितात. त्यादृष्टीने 'उत्खनन' हे कादंबरीचे नाव प्रतीकात्मक आहे असे वाटते.

गौरी देशपांडे यांच्या जवळजवळ सर्वच कादंबऱ्यातील स्त्री पात्रे उच्चशिक्षित, आर्थिक, मानसिक, वैचारिक, व्यावहारिक साऱ्याच अंगांनी स्वतंत्र, स्वावलंबी अशी आहेत. उत्खननमधील दुनिया ही नायिका उच्चशिक्षित आहे. नोकरी करणारी आहे. स्वतंत्र विचारांची आहे. तिच्या आईची इच्छा असते की दुनियाने इतरजणींसारखे संसारी जीवन जगावे. वडिलांचे मत स्वत: सारखे शास्त्रज्ञ व्हावे. पण ती म्हणते अखेर मी माझ्याच मनाचे ऐकले. पण तरीही, ती स्वत:च्या मनाचा, मतांचा मान राखताना इतरांनाही दुखवताना किंवा त्यांना कमी लेखताना दिसत नाही. उलट ती मी आहे ही अशी आहे. माझ्यासारखीला मणीसारखे रतन व्हावे हे भाग्य समजते. शिवाय माझे घर किंवा मी स्वत: माझी एकटीची नाही. मला इथपर्यंत येण्यासाठी अनेकांनी घडविले आहे हे प्रांजळपणे मान्य करते.

उच्चशिक्षित असली, उच्चभ्रू लोकांचे काही गुण आत्मसात केले असले तरी भारतीय संस्कार, मातीची ओढ, तिचा सुगंध, तिच्या मनात दरवळत असल्याची जाणीव होते. माणसाकडे प्रथम माणूस या नात्याने बघण्याची तिच्या नजरेला सवय होती. घरातील नोकरमाणसे, त्यांच्याही वयाचा, दु:ख कष्टांचा ती माणुसकीच्या नात्याने विचार करते. घरातील माणसाप्रमाणेच ती कुत्री-मांजरे यांना जीव लावते. एवढेच नव्हे तर त्यांच्याही मतांचा आदर स्वीकार करताना दिसते.

वडिलधाऱ्यांचा आदर करणे तसेच मुलांना स्वातंत्र्य देणे म्हणजे मागच्या व पुढच्या पिढीचे व्यवस्थित आदर व स्वागत करण्याची तिची क्षमता आहे. पाश्चात्य संस्कृतीतील काही पैलूंचा ठसा मनावर उमटू दिला असला तरी पूर्ण त्या संस्कृतीच्या पुढे नतमस्तक झालेली कुठेही दिसत नाही. आई-बापू असे मनांतील भाव जपणारे शब्द वापरुन ती भारतीय मनाची ग्वाही देते. सहकाऱ्यांना सहकार्य करतानाही दिसते. नात्यातील निर्मळपणा सांभाळते. अशाप्रकारे उत्खनन कादंबरी अभ्यासताना लक्षात येते ते माणसाचे अपुर्णपण माणूस हा सतत वाढत आहे , बदलत आहे, म्हणजेच तो अपूर्ण आहे. या अपुर्णपणामुळेच त्याला पुर्णत्वाचा ध्यास लागलेला असतो. हे अपूर्णपण समजून घेणे हेच उत्खननचे रहस्य आहे.

**स्वभावदर्शन :-**

कथा, कादंबरी किंवा नाटक कोणताही साहित्यप्रकार असो तो अनेक घटकांच्या सुसूत्रपणाने आकार घेत असतो. वाङ्मय ही कला आहे. तंत्रपध्दती, शास्त्र यांच्या पायावर मानवी मनातील कल्पनेची इमारत उभी राहिली तर ती वाङ्मय या संकल्पनेत आपले अस्तित्व सिध्द करु शकते असे म्हटले जाते. कादंबरीच्या कथानकामध्ये 'स्वभावदर्शन' या घटकाला विशेष महत्व आहेच. तसे साऱ्याच घटकांना प्रत्येकाचे वेगळे स्थान आहे. पण व्यक्तिदर्शन हे अधिकच आपले महत्व दर्शवते. कोणत्याही साहित्याच्या मुळाशी 'माणूस' हा घटक असतोच असतो. म्हणजे माणसाला इतर मानवी मनाचे त्याच्या अंतरंगात शिरुन दर्शन घ्यावे लागते. हे मनापासून मनाचे घेतलेले दर्शन त्याला समरसतेने, कल्पकतेच्या कुशलतेने इतर अनेक हृदयापर्यंत पोहचवण्याचे काम करायचे असते. वरवर दिसते तेवढे हे काम सोपे नसते.

साहित्यिकाने एखादे कथानक लिहायचे ठरवतातच तो प्रथम विचार करतो तो त्यातील पात्रांचा, त्यांच्या स्वभावांचा, त्याच्या भूमिकेचा. माणूस म्हणजे फक्त हाडा-मासांचा सांगाडा नाही. त्याचे ठिकाणी चैतन्य आहे, तसेच इतर प्राण्यांपेक्षा निराळे म्हणता येतील असे बरेच गुण आहेत. विचारशक्तीच्या जोरावर व बुध्दीच्या कुवतीवर आरुढ होऊन त्याने अनेक क्षेत्रात प्रगतीची गरुडझेप

घेतलेली आपण पाहतोच. संवेदनशील मनावर एखाद्या घटनेचा पडणारा प्रभाव तो शब्दरुपाने मूर्तस्वरुपात साकारतो. त्यात तो इतरांच्या मनोव्यापाराचे, त्यांच्या स्वभावाचे बारकाईने जवळून अवलोकन करतो व त्यांच्या त्याला भावलेल्या, समजलेल्या छटा शब्दात रुपांतरित करतो. म्हणजे कोणत्याही साहित्यात माणूस महत्वाचा. त्या अनुषंगाने येणारे त्याचे विचार, त्याचा स्वभाव म्हणजेच मानवी मनाच्या विविध पैलूवर प्रकाश टाकून उजेडात आणण्याचे काम, साहित्यिकाला करावे लागते.

प्रत्येकाचे रंग, रुप जसे निराळे असते तसेच या बाह्य रुपाप्रमाणे प्रत्येकाचे अंतरंगही वेगळे असते. रचनेच्या दृष्टीने साम्य असणाऱ्या मानव प्राण्यात नियतीने गुण–वैशिष्ट्यात विविधता भरुन कुशलतेने एकतेतून ही विविधतेच्या छटांचे फटकारे मारले आहेत. त्यामुळेच व्यक्तिगणिक त्याचा स्वभावधर्म बदलत जातो. प्रत्येकजण आपल्या विचारांच्या अधिष्ठानाप्रमाणे स्वतंत्रपणे आपली ओळख करुन देत असतो.

साहित्यिकाच्या विचारांचा, स्वभावधर्माचा प्रभाव त्याच्या साहित्यावर असतो हे मान्य केले तरीही त्याला आपल्या मनावरचा पडदा बाजूस सारुन इतरांच्या मनाचा ठाव घ्यावा लागतो. त्याच्या स्वभावाशी, गुणवैशिष्ठयांशी मनोव्यापाराशी समरस व्हावे लागते. तेव्हाच त्याला आपल्या कथानकातील पात्रांना न्याय देता येईल. अर्थातच कोणत्याही साहित्यात स्वभावदर्शन हा अत्यंत महत्वाचा घटक असतो.

'गौरी देशपांडे' यांनी आपल्या 'उत्खनन' या कादंबरीत तशी मोजकीच पात्रे योजली आहेत. इतर जी काही येतात, ती पाहुण्यांसारखी डोकावताना दिसतात. तशी त्यांची ही कादंबरी लहान आहे. या छोट्या कादंबरीत त्यांनी समाजाच्या दृष्टीने मोठा आशय नजरेसमोर मांडला आहे. जवळजवळ त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू 'स्त्री' हाच असतो. आतापर्यंत रूढीने स्त्रीच्या शरीराचाच फक्त विचार करणाऱ्या समाजापुढे त्यांची कादंबरी आव्हानात्मक तशीच विचार करायलाही लावणारी वाटते. स्त्रीचे शरीर जपणे, ते नाजूक ठेवणे, सजवून त्याला अजूनच सुंदर बनवणे शक्यतो ते झाकून ठेवणे इ. बाबतीत तिच्या शरीराला विशेषत्व देवून तिच्या मनाचा मात्र कोणी विचार केला नाही.

सर्वसामान्य स्त्रीच्या अंतराची हाक समाजाच्या हृदयापर्यंत पोहचवण्याचे काम त्यांची नायिका करते असे आपल्याला आढळून येते. स्त्रीलाही आवाज आहे, एवढेच नव्हे तर तिच्या आवाजालाही अर्थ आहे याची जाणीव त्या समस्त समाजाला करुन देतात. त्याअनुषंगाने त्यांच्या उत्खनन मधील नायिका 'दुनिया' हिचे चित्रण त्यांनी केलेले दिसते.

**दुनिया :-**

सर्वसामान्य कुटुंबात जन्म घेणारी, साधारण रंगरुपाची ही नायिका आपल्या जीवनाचे मात्र वेगळेपण वाचकासमोर सिध्द करते. वडील शास्त्रज्ञ असतात. पण आई मात्र इतर आयांसारखीच प्रथमदर्शनी वाटते. मुलीने लग्न करुन संसार करावा या विचाराची वाटते. पण ज्यावेळी मुलीला आई-वडिलांच्या आधाराची गरज असते तेव्हा तिची चूक पोटात घालून भक्कमपणे तिच्या पाठीशी उभी राहते. तेव्हा ती समाजापेक्षा मुलीच्या मनाचा विचार करते. लोकनिंदेकडे दुर्लक्ष करते व स्वत:चे वेगळेपण सिध्द करते.

दुनियाला फिजिक्स, केमिस्ट्रीमध्ये रस वाटेनासा होतो तेव्हा ती मनाविरुध्द तेथे शिकत बसण्यापेक्षा पुरातत्व विषयाचा आपला अभ्यास पूर्ण करते. कॉलेजमध्ये तिच्या जीवनात एक पुरुष मित्र येतो. त्यांची सलगी होते. तन-मन एक होतात. नियती आपले काम करण्यास चुकत नाही. तिला आई होण्याची लक्षणे दिसू लागतात. ही गोष्ट कळताच तिचा मित्र अनंत निघून जातो. वडिलांना ही गोष्ट सांगण्याचे धाडस एकवटते. आई-बापू व दुनिया एक मताने बाळाला जन्म देण्याचा निर्णय घेतात. इथेही लेखिका पळवाट शोधत नाही. राहत्या वस्तीपासून दूर जाऊन बाळाला जन्म देणे व लोकांना काही तरी बहाणा सांगून अंधारात ठेवणे असा विचार तिच्या आई-वडिलांना पटत नाही. ते तिथेच राहून लोक टीका स्वीकारुन तिच्या बाळाचे स्वागत करण्यास तयार होतात. चूक झाली म्हणून त्यास अव्हेरुन, समाजाच्या भीतीने जीवन थांबवण्यापेक्षा चूक झाली ती मान्य करुन काहीसे समाजाकडे दुर्लक्ष करुन जीवन गतिमान ठेवले पाहिजे हा त्यांचा विचार असतो.

तिला मुलगी होते. दुनियाची आईच बाळ सांभाळते. दुनिया आपले शिक्षण पूर्ण करुन परदेशात पुरातत्वशास्त्राची डिग्री घेऊन प्राध्यापकाची नोकरी करत असते. या अभ्यासासाठी परदेशात असताना एका भारतीय व्यक्तिची ओळख होते. तो न्युरो सर्जन असतो. लग्न करुन तो दुनियाच्याच घरी राहतो.

गौरीताईंची 'दुनिया' ही साधारण व्यक्तिमत्वाची स्त्री आहे. त्यांनी काही बाबतीत तिचे वेगळेपणे दाखवले असले तरी तिच्या जवळ स्त्रीसुलभ भावुकताही आहे. देशाबाहेरची संस्कृती तिने स्वीकारली असली तरी नात्यातील नाजूक पदर जपताना दिसते. सहकाऱ्यांना मदत करण्याची वृत्ती, मैत्रिणीच्या मुलांना जीव लावण्याची, आपलेपणाची आस तिच्याकडे आहे. रस्त्यावरुन पायी चालतानाही समोरच्याशी उद्धटपणे न वागता त्याच्या कलाने घेण्याचा तिचा स्वभाव दिसतो.

पहिला मित्र अनंता आईपण देवून जीवनातून निघून गेल्यावरही ती संयम सोडत नाही. त्याची मनोभूमिका समजून घेण्याचा प्रयत्न करते. मी माणूस आहे हे समजून घेताना समोरचाही माणूस आहे हे समजणे महत्वाचे असते. तशी ही 'दुनिया' दुनियाकडे बघण्याची तिची दृष्टी पारदर्शक आहे. स्वार्थासाठी मित्र जोडणारे, प्रेमापेक्षा प्रेमाचा आभास निर्माण करणारे अनेकजण भेटतात. पण मित्राच्या नात्यातील निरपेक्षता, निर्मळता जपण्याचा तिचा स्वभाव आहे. तिची मैत्रीण अभया हिच्याशी तिच्या मनाचे नाते जोडलेले असते. तिच्याकडे ती कधी सच्ची मैत्रीण, कधी वरिष्ठ, तर कधी मनातील खळबळ शमविण्याचे स्थान म्हणून पहाते. अशा अनेक नात्यांनी ती अभयकडे बघत असते. तिच्या तिन्ही मुलांना आपल्या मणी एवढाच जीव लावते. त्यांच्या कलागुणांचे कौतुक करते. त्यांच्या अडचणी वाटून घेते. आनंदात सहभागी होते. अशी निखळ मैत्रीची उदाहरणे या यंत्रयुगात फार कमी दिसतात. पण अशी माणसे नाहीतच असेही नाही.

ही नायिका परदेशी संस्कृतीचा स्पर्श झालेली असली तरी घराला घरपण देणारी आहे. घर म्हणजे चार भिंती, वस्तू मांडण्याचे ठिकाण असे मानणा–यातली नाही. तर 'घर म्हणजे घरातील माणसे', हाच तिचा भाव आहे. तिच्या घरात, मनाच्याही गाभाऱ्यात आई–बापू, मणी, दयाळ यांचेबरोबरच नोकरांनाही स्थान आहे. तसेच अभया तिची मुले – नवरा यांनाही जागा आहे. एवढेच काय कुत्री–मांजरे यांचाही हक्क आहे. नव्हे त्यांच्याही मतांना आदर आहे. आई–वडिलांना आई–बापू असे भावपूर्ण शब्दात संबोधते. गौरीताईंची 'दुनिया' ही नायिका त्यांच्या इतर नायिकासारखी पतीला एकेरी नावाने बोलवणारी आहे. स्वत:चे स्वातंत्र्य सांभाळताना दुसऱ्याच्या स्वातंत्र्याला तडा जाणार नाही याचेही भान ठेवणारी आहे. मणीला मूल व्हावे असे तिला वाटत असते. पण मणीचे विचार वेगळे असतात. ती तो विचार तिला बोलून दाखवते पण मणीने तिच्या मनाविरुध्द व आपल्या मनाप्रमाणे करावे असे काही म्हणत नाही.

उतारवयात अनंता भेटायचे म्हणतो तेव्हा मोठ्या मनाने त्याला माफ करुन त्याला बोलावून घेते. तिला धर्मसंकटात टाकून गेलेला अनंता जीवनाच्या संध्याकाळी तिच्याकडे आपलेपणाचा, सहकार्याचा हात मागतो. तेव्हाही ती द्वंद्वांत न पडता त्या संधीप्रकाशातही त्याला मदतीचा स्नेहभरा हात देते. तिच्या मनाची विशालता येथे सामान्य स्त्रीपेक्षा वेगळेपण दर्शवते. अशी ही गौरी देशपांडे यांची 'दुनिया' समाजातील इतर स्त्रीपुढे आपले स्वतंत्र अस्तित्व सिध्द करते. स्त्री ही सुध्दा माणूस आहे. जीवनप्रवासात तिच्याकडूनही चुकून तरी चुका होणार. अशा वेळी मार्ग काढत जीवनप्रवाह सुरु ठेवणे हे माणूसपणाचे लक्षण आहे. व ते स्त्रीलाही लागू आहे असेच त्या सूचित करतात. प्रत्येकाला स्वत:वर प्रेम करण्याचा

अधिकार आहे. तसेच दुसऱ्यावरही निखळ स्वार्थरहित प्रेम करुन मानवतेने वागता येते हे दाखवणारी आहे.

हृदयाची हाक ऐकणारी, अंतरात आभाळाएवढी माया असणारी, स्वत: बरोबर इतरांकडे माणसाच्या नजरेने बघणारी, परदेशी काही तत्वे अंगिकारली तरी भारतीय संस्कृतीला जागणारी, नात्यात निर्मळता राखणारी अशी ही दुनिया दुनियेतलीच एक पण दुनियापेक्षा वेगळेपण भासवणारी वाटते. तिचे दुनिया हे नाव प्रतीकात्मक वाटते. तिच्या वडिलांनी साऱ्या दुनियेतल्या मुलांच्या प्रतीक रुपाने तिला हे नाव दिलेले आहे असे वाटते.

**दयाळ :-**

गौरी देशपांडे यांच्या 'उत्खनन' या कादंबरीतील हा नायक. दुनियाचा पती. परदेशी न्यूरोसर्जरीचा अभ्यास करुन भारतात परतलेला. अत्यंत हुशार, पण पुरुषत्वाचा खोटा अहं न जोपासणारा. दुनियाची व त्याची ओळख परदेशातच होते. दोघेही आपला अभ्यास पूर्ण करण्यासाठी गेलेले असतात. त्याच्या नावाचे रहस्य तो सांगतो. कानामागे एक पांढरी बट जन्मताच त्याला असते. त्यावरुन त्याच्या आईने दयाळ पक्षाशी साम्य म्हणून त्याचे नाव दयाळ ठेवलेले असते. नावाप्रमाणे तो प्रेमळ असतो. त्याचे आई-वडील त्याच्या लहानपणीच वारलेले असतात. तो म्हणतो, ''मी सोळा वर्षाचा असताना आई वारली व त्यानंतर दोन वर्षांनी वडील. डोक्याची बुध्दी हा एकच त्यांचा वारसा होता.''[२]

दयाळ हा पोरका होता. त्याचे हृदयाचे घर रिकामेच असते त्याच्या घरासारखे. त्यामुळेच की काय तो दुनियाच्या कुटुंबाला तिथे पक्के स्थान देतो. तिचे आई-वडील, मणी, एवढेच काय नोकर माणसे व कुत्री-मांजरे यांनाही आपले समजतो. त्याचबरोबर अभया व तिचा पती आणि मुले यांनाही मनापासून स्वीकारतो. दुसऱ्या बाजूने ही मंडळीही त्याला आपलेपणाने स्वीकारतात. दुनिया म्हणते त्याने माझ्याशी लग्न करुन माझे सारे कुटुंब आपले म्हटले यात वावग काही नाही. तर त्याला ते कुटुंब मनापासून आवडले, म्हणून हरखून जाऊन त्याने स्वत:ला आमच्यामध्ये गुंतवून टाकले. आमच्या आयुष्यात उडी घेऊन बुडी मारली. असा हा दयाळ निर्मळ वृत्तीचा असतो. पत्नीचा विश्वास संपादन करतो. तिच्या मुलीला आपल्या स्वत:च्या अपत्याप्रमाणे जीव लावून तिच्या आयुष्यातील वडिलांची उणीव भरुन काढतो. खरे तर त्याला जशी आपलेपणाची, आपल्या कुटुंबाची एक पोकळी जाणवत असते. तशीच पोकळी काही प्रमाणात तरी दुनियाच्याही कुटुंबात, जीवनात असतेच. तिला विश्वासाने आपले म्हणणाऱ्या पतीची व मणीला वडिलांची गरज असते. ती तो पुरी करतो. तिच्या रंगरुपावर भाळून नव्हे तर तिच्या विचारातील

विश्वासावर तो विश्वास ठेवतो. मणीलाही आपल्यासारखीच न्यूरोसर्जन बनवतो. दोघे मिळून स्वत:चे हॉस्पिटल सुरु करतात.

दयाळ पत्नीवर किंवा मुलीवर माया करतो. पण त्यांचेवर स्वत:चे मत लादण्याचा पुरुषीपणा त्याने कधी केलेला दिसत नाही. त्यांच्या एकमेकांवरील प्रेमात विश्वासाचे बंध असतात. त्यामुळे एकमेकांनी कोणाचे स्वातंत्र्य धोक्यात येणार नाही याची काळजी घेतलेली दिसते.

प्रेमाची भावना सांभाळताना तो कर्तव्यदक्षही दिसतो. आई–बापू औषधाने बरे होणार नाहीत. प्रयत्न करुन वाचणारे नाहीत हे पटल्यावर उगीच त्रासिक, दु:ख, वेदनामय जीवन जगत राहण्यापेक्षा स्वेच्छा मरणाला सहमत होतो.

तसेच अनंता दुनियाचा मित्र, ज्याने दुनियाला भर दुपारी तिच्या जीवनात अंधार निर्माण करण्याचा प्रयत्न केला किंवा ज्याने मणीसारखे रत्न नाकारले, तो परत त्यांच्या घरी येणार असतो. आयुष्याच्या संकटसमयी तयाला दुनियाची आठवण होते. तिच्या मदतीची, स्नेहाची अपेक्षा करतो. तेव्हा कोणत्याही सामान्य व्यक्तीने नाराजी व्यक्त केली असती. पण दयाळ इथे आपले असामान्यत्वच जणू स्पष्ट करतो असे वाटते. त्याची माणसाकडे बघण्याची दृष्टी निराळी वाटते. माणसाला समजून घेण्याची त्याची कुवत आहे. सर्जन म्हणून तो अनंतावर सर्जरी करणार असला तरी माणुसकीच्या नात्याने दुनियाचा मित्र म्हणून तो त्याला काही काळ आपल्या घरी ठेवून घेण्याचा सहृदयपणाही दाखवतो. त्याने जबाबदारी झिडकारली असती. तरी दुनिया कदाचित काही बोलू शकली नसती. त्याच्या मरणाने त्याला मरु दिले असते तरी त्याचे काही बिघडले नसते किंवा समाजाने त्याला रुढार्थाने दोषीही ठरविले नसते. पण तो यापैकी काहीही करत नाही उलट सत्य परिस्थिती जाणून, त्याच्या समोर ठेऊन, त्याच्या वयाचा विचार करुन, त्याने ऑपरेशन करुन घ्यावे असे सुचवितो. आणखी दहा तरी वर्षाचे दान त्याच्या पदरात टाकण्यासाठी प्रयत्न करतो. दुनियाला तिच्या आई–बापूंना, मणीला एकूण साऱ्यांना आपले म्हणतो. हे एक वेळ पटू शकते पण अनंताला आपले म्हणण्यासाठी हृदयात सागराची अथांगता असावी लागते, ती त्याच्या स्वभावात दिसते.

**मणी :-**

गौरी देशपांडे यांच्या 'उत्खनन' या कादंबरीतील हे व्यक्तिचित्र आहे. मणी ही कादंबरीची नायिका दुनियाची मुलगी आहे. दुनियाला ती लग्नाच्या अगोदर झालेली असते. अनंता हा दुनियाला कॉलेज जीवनात भेटलेला मित्र. त्याची व दुनियाची ही कन्या असते. रंगरुपाने सुंदरता ती पित्याकडून घेऊन आलेली आहे. तिची मानसिक, शारीरिक घडण करण्यामागे तिच्या आजी-आजोबांचा सिंहाचा वाटा असतो. दुनिया ही तिची केवळ जन्म दिला म्हणून आई असते. पण दुनियाची आई म्हणजे मणीची आजीच तिचे पालकत्व, आईपण सांभाळते. बुध्दिने अत्यंत हुशार असल्यामुळे शिक्षण लवकर पूर्ण करते. तिचे लहानपणापासून अगदी विचारी व्यक्तिमत्व गौरीताईंनी रेखाटले आहे. दयाळ जेव्हा तिला प्रथम भेटतो तेव्हा ती त्याचा पिता म्हणून आदरपूर्वक स्वीकार करताना दिसते. सर्वांपेक्षा वेगळे असे 'अप्पू' या नावाने एकेरीच त्याला संबोधते. कोणतेही लौकिक नाते नसताना त्या दोघांमध्ये एक प्रकारचा रेशमी बंध निर्माण झालेला दिसतो. विश्वास, प्रेम, आपलेपणा यांच्या बळावर मणी दयाळला आपलेसे करते. मायलेकीपेक्षा बाप-लेकीचेच नाते अधिक घट्ट असते.

मणीही दयाळप्रमाणे न्यूरोसर्जन होते. त्याच्यापेक्षाही ती अधिक हुशार असते. दयाळला जेव्हा हॉस्पिटलसाठी पैशाची गरज असते. तेव्हा घरावर कर्ज काढण्यासाठी बालवयातही ती पुढाकर घेते. उलट आपण दोघे मिळून ते कर्ज फेडू असे आश्वासन ही देते. म्हणजे 'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' तसे मणी लहानपणापासूनच आत्मविश्वास, निश्चयी होती असे वाटते. ध्येयपूर्तीसाठी ती लौकिक जीवनाकडेही पाठ फिरवण्यास तयार असते.

जीवनाच्या एका वळणावर तिला जब्बार भेटतो. लग्नासारख्या विधीवर तिचा पूर्ण विश्वास नसतो. तरीही आईच्या म्हणण्याप्रमाणे जब्बारशी ती विवाह करते. जेमतेम वर्षभर त्यांचा संसार टिकतो. नंतर ती परत माहेरी येते. लग्न-संसार-मुले एवढे व एवढेच मर्यादित जिणे तिला पसंत नसते. उच्चशिक्षित स्वतःच्या जीवनाविषयी पूर्ण आत्मभान आलेली ती स्त्री असते. मानवी जीवन हे फक्त लग्न करुन, घर बांधून, मुले सांभाळण्यासाठीच आहे. याच्या अगदी ती विरोधी स्वभावाची असते. आपल्याला जी बुध्दी लाभली आहे, तिच्या बळावर आपण जी कुशलता मिळवली तिचा उपयोग समस्त मानवासाठी समाजासाठी करणे हे मानवी जीवनाचे ध्येय हवे या विचाराची ती आहे.जब्बार व त्याचे कुटुंबीय सर्वसामान्य लोकांप्रमाणे तिच्याकडून संसार मुले यांची अपेक्षा करतात. जब्बार ही वेळोवेळी तिने

आपल्या मुलाची आई व्हावे अशी इच्छा व्यक्त करतो. पण ती ते मान्य करत नाही. प्रथमदर्शनी आपल्याला जब्बारचे मत चुकीचे वाटतही नाही. संसार म्हटले की मुले-बाळे हे सारे आलेच. पण मणीचे विचार असे आहेत की केवळ मुलांना जन्म देऊन आईचे कर्तव्य संपत नाही तर तेव्हापासूनच तिच्या कर्तव्याला सुरुवात होते. त्यांचे संगोपन, जबाबदारी या सर्वांसाठी वेळ देणे गरजेचे असते. आणि तोच वेळ ती देण्यास तयार नसते. जगात एवढी बालके पडली असताना माझ्या पोरांची भर कशाला ? असे तिचे मत असते. याच कारणावरुन ती माहेरी परत येते.

दुनिया आईपणाच्या, मैत्रीणीच्या नात्याने तिच्या मूल होण्याविषयी चार गोष्टी ऐकवते. तेव्हा ती तिला स्पष्ट सांगते की, ''माया करायची, माया लावून घ्यायची भूक मलाही आहे. पण मी ती फक्त जन्मदात्या आई-बापांसाठी आणि पोटच्या मुलांसाठी राखून ठेवणार नाही.''[३] यावरुन तिच्या उदात्त भूमिकेचे दर्शन लेखिकेने घडविले आहे. गौरी देशपांडे यांच्या कथानकातील स्त्री ही अशीच बऱ्याच अंशी उदात्ततेचा पुरस्कार करणारी असते. शिक्षण घेतले, नोकरी केली. स्वत:ची मुले - नवरा - संसार यांना सांभाळण्याच्याच कामी फक्त तिचे शिक्षण किंवा नोकरी असत नाही. त्या शिक्षणाचा, बुध्दीचा वापर समाजासाठीही होणे गरजेचे असते. व हेच माणूसपणाचे लक्षण आहे अशी मानणारी ही मणी आहे. संकुचित जीवन सारेच जण जगतात. कित्येक आले गेले त्यांची गणती कोण करतो ? पण स्वत:च्या जीवनात समाजाला स्थान असणे, मग त्यासाठी लौकिक जीवनात येणाऱ्या अडचणी, कटकटी यांना सामोरे जाण्याची तयारी ठेवणे असे जीवन मिळणे दुर्मिळ असते. हे सारे सर्वांना सहज शक्य होणारे नसते. गौरी देशपांडे यांचे आजोबा महर्षी कर्वे यांची इथे आठवण येते. समाजातील विधवा स्त्रियांचे हाल पाहून हळहळणारे खूप जण होते. पण त्यावेळच्या परिस्थितीत प्रवाहाविरोधी पोहण्याचे धाडस करणारे महर्षी कर्वे. पत्नीच्या मृत्यूनंतर विधवेशी लग्न करुन कृतीशीलतेचा पायंडा घालतात. त्यावेळी त्यांना, त्यांच्या कुटुंबाला किती त्रास सोसावा लागला असेल याची कल्पनाच न केलेली बरी ! समाजहिताचा विचार फक्त मनात घोळवणे वेगळे. पण त्यापुढे जाऊन सक्रिय तो अंमलात आणणे निराळे असते. तेथे लौकिक जीवनापेक्षा अंतरमनाची हाक, समाजासाठी पुढे केलेला सहकार्याचा हात महत्वाचा असतो.

समाजासाठी फक्त पुरुषच कार्य करु शकतात असे नव्हे तर स्त्रियाही योगदान देऊ शकतात. कारण त्यांच्याही ठिकाणी मी माणूसच आहे, ते मी ही करु शकते याचे भान जागृत झालेले आहे. याची प्रचिती गौरीताईंची ही मणी करुन देते असे कांदबरीभर वाटते.

एका बाजूने विचार केला असता मणी आपल्याला मनमानी वाटते. मुलांपेक्षा करिअर प्रिय मानणारी, समाज विघातक स्त्री वाटते. पण दुसऱ्या बाजूने मणीच्या अंतरमनाशी समरस होऊन विचार केला असता तिच्या त्यागाची, उदात्ततेची प्रचिती येते. भगवंताने दिलेला अमोल मानवी देह, बुध्दिमत्ता, या साऱ्यांचा वापर फक्त चिमणी–पाखरासारख्या घरट्यात राहून संसार करण्यासाठी करायचा ? असाच तिचा प्रश्न आहे. हा मानवी देह विचारांनी पक्व, बुध्दिने कुशाग्र होण्यासाठी अनेकांचे सहकार्य, मदत लाभलेली असते. त्या समाजहितासाठी आपली बौध्दिक शक्ती खर्च करणे हे माणूस म्हणून आपले कर्तव्य आहे. या स्वभावधर्माची ही मणी आहे. आपल्या समाजात मी – माझे – मलाच्या वृत्तीने पिसाटलेल्या अनेकांच्यात ती आपल्याला निराळी, अगदी वेगळी वाटते यात नवल कसले ?

शेवटी तिचा जन्मदाता पिता अनंता शेवटचे क्षण मोजण्याच्या अवस्थेत तिला भेटतो. तेव्हाही ती तटस्थपणे त्याचे स्वागत करते. तिच्या जन्माची जबाबदारी टाळून निघून गेलेला अनंता शेवटी तिच त्याला पुर्नजन्म देते. बालपणापासून तिची मनोभूमी लेखिकेने संकुचित न ठेवता उदात्त स्वरुपात प्रकट केली आहे. आणि त्याच उदार मनाने ती अनंतास ही जीवदान देण्यास तयार होते.

गौरी देशपांडे यांच्या या कादंबरीतील पात्रे खरोखरच वाचकास अंतर्मुख करतात. अशी एकमेकांच्या चूका पोटात घालून सहजपणे जीवन गती चालू ठेवणारी माणसे असतात का ? पण नसतील कशावरुन ? असे ही वाटते. भावना जपत, कधी वेळप्रसंगी दडपत, कर्तव्याची धुरा सांभाळत, झाले गेले विसरुन, नवा दिवस नव्या रुपात बघत जीवन गाणे गात राहणारी माणसे समाजात भेटतात. यावरही विश्वास ठेवावा लागतो. एकूणच गौरी देशपांडे यांचे हे व्यक्तिचित्र मनावर दीर्घकाळ विचार स्पंदने उठवणारे आहे.

**अनंता :–**

अनंता हा 'उत्खनन' मधील उत्खनन करायला लावणारे व्यक्तिचित्र आहे. कादंबरीत सुरवातीला व शेवटी भेटतो. सुरुवातीला भेटून कादंबरीत गूढ रहस्ये गाडतो व शेवटी गाडलेल्या आठवणी पुन्हा उकरुन, उत्खनन करायला लावतो.

नायिका दुनिया हिला कॉलेजपूर्ण व्हायच्या आधीच तो भेटतो. दुनियाला तिने वडिलांच्या मर्जीने घेतलेल्या विषयात रस नसतो. अशा निरस मन:स्थितीत तो तिला भेटतो व जीवनासंबंधी वेगळेच काही तरी बोलतो. त्या क्षणी तिला ते जवळचे वाटते. अभ्यासापेक्षा हेच वास्तव आहे, सत्य आहे, असा समज ती करुन घेते. त्यातूनच त्यांचे मनोमीलन होते. दुनिया आपल्या बाळाची आई होणार हे समजताच तो

तिच्या आयुष्यातून निघून जातो. स्वत:विषयी, जीवनाविषयी त्याची काहीशी निराळीच मते असतात. स्वत:च्या नावातही त्याला रस नसतो. मग आपल्या जीवनाला धुमारा फुटणार आहे हे त्याला मानवत नाही. स्वत:च्या अस्तित्वाविषयी निश्चित ध्येय नसणारा अनंता पितृपणाची जबाबदारी अप्रत्यक्षपणे नाकारतो. कादंबरीभर त्याचा वावर नाही. पण शेवटी त्याला ब्रेन ट्युमर होतो. तेव्हा त्याला आपल्या माणसांची आठवण होते. पत्र टाकून तो दुनियाला भेटण्याची इच्छा व्यक्त करतो. तिच्या जीवनावर, मुलीवर हक्क, अधिकार दाखवण्यासाठी नव्हे, तर शेवटचे काही क्षण तिच्याजवळ राहण्याची अपेक्षा व्यक्त करतो. ती नाही म्हणणार नाही असा विश्वासही त्याला असतो.

दुनिया, दयाळ व मणी यांच्या सहमतीने तो त्यांच्या घरात प्रवेश करतो. ऑपरेशनच्या अगोदर काही दिवस दुनियाच्या घरी राहण्याची इच्छा व्यक्त करतो. तिच्या जीवनाविषयी ,पती-मुले याविषयी जाणून घेण्याचा तो प्रयत्न करत नाही. मणी ही फक्त रंगरुपाने आपली आहे. बाकी ती गुणाने-विचाराने-बुध्दिने तिच्या आई-बापू सारखी आहे हे तो मान्य करतो.

आयुष्यभर देशा-परदेशात भटकंती करत राहतो. अनेक भाषा शिकतो. त्याला काव्याची आवड असते असे दिसते. बोर्हेजच्या काव्याचा त्याच्या मनावर विशेष प्रभाव दिसतो. दुनियाच्या घरी आल्यावर तिच्या कुटुंबाला आपलेसे करतो. अर्णवशी त्याचे विशेष सख्य होते. ऑपरेशन करुनही संपूर्ण वाचण्याची शक्यता नाही असे मणी-दयाळ स्पष्ट करताच स्वत:च्या जीवनाचा निर्णय मात्र दुनियावर सोपवतो. तू म्हणत असशील तर ऑपरेशन करुन घेतो असे म्हणतो. बोर्हेजच्या कवितेतील वाघ तो दुनियाला समजतो. स्वत:कडे कधी कसला मोठेपणा घेत नाही. नाही म्हणायला जब्बारला चार गोष्टी ठणकावून सांगण्याचा प्रयत्न करतो.

गौरी देशपांडे यांनी चितारलेले हे व्यक्तिचित्र ही तसे विचार करायला लावणारे वाटते कारण ते सर्वसामान्यांपेक्षा निराळे आहे. पित्याच्या जबाबदारीतून पळ काढलेला अनंता मधली अनेक वर्षे गायब असतो. शेवटी मात्र मरतेवेळी त्याला दुनियाची आठवण येते. तेव्हा तिच्या विश्वासाने तिच्या घरी येतो. इतकी वर्षे मुलगी, दुनिया यांचा विचारही न करणारा अनंता जन्म मरणाच्या उंबरठ्यावर आपल्या माणसांची आठवण जागी करतो. मी केले ते चूक की बरोबर या वादात न पडता जे वाट्याला आले त्याचा स्वीकार करणारा वाटतो. परत आल्यावरही मणी किंवा दुनियावर अधिकार दाखवत नाही.

जसा हक्क दाखवताना दिसत नाही तसा कुठे हे सारे माझे होते, मला मिळाले नाही, मी वंचित राहिलो. अशी खंतही व्यक्त करताना दिसत नाही. म्हणूनच त्यांचे हे व्यक्तिचित्र काहीसे सर्वसामान्यांच्या चौकटीहून निराळे वाटते. शेवटी तो दुनियाकडे परततो तो ही तटस्थ वृत्तीनेच. तेथे त्याची अगतिकता जाणवत नाही. पण त्याचा दुनियावरचा विश्वास मात्र स्पष्ट होतो. तीच तटस्थ वृत्ती त्याची स्वत:विषयीही दिसते.

**जब्बार –**

उत्खनन या कादंबरीतील हे व्यक्तिचित्र आहे. हा मणीचा पती या भूमिकेत आहे. गौरी देशपांडे यांच्या नायिका नेहमीच उच्चशिक्षित स्वयंभू असतात. तशीच यातील मणीही न्यूरोसर्जन आहे. तिचा पती म्हणून जब्बार तिच्या जीवनात येतो. जब्बारचा स्वभावधर्म कुठेच मणीशी मिळता जुळता दिसत नाही. तो सर्वसामान्य व्यक्तिमत्वाचा, विचारपद्धतीचा वाटतो. पत्नी – घर – मुले – संसार म्हणजे कुटुंब आबाद राखून जीवनाची इतिकर्तव्यता मानणारा आहे. अगदी त्याच्या उलट त्याची पत्नी मणी असते. त्याला आई–बाबा व दोन बहिणी असा परिवार असतो. व्यवसायाने तो चित्रकार असतो. पत्नीकडून मुलाची अपेक्षा करणारा आहे. पत्नीने आपल्या घरी राहून कुटुंब–मुले सांभाळत संसार करावा ही सामान्य चार चौघांसारखी त्याची सामान्य अपेक्षा आपल्याला चुकीची वाटत नाही. पण तो मणीच्या मनाशी पती म्हणून एकरूप झालेला दिसत नाही. तिचे ध्येय, तिचा स्वभाव, तिचे समाजातील स्थान असा सारासार विचार करता केवळ संसार–मुलांत जीवनाची पूर्तता असते असे त्याने मान्य करावे का ? परस्परांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा न आणता, परस्परांच्या भावना–विचारांची कदर करणे, गुणदोषांसह एकमेकांना सहन करणे हे जोडीदार म्हणून प्रत्येकाचे कर्तव्य आहे असे मानणाऱ्यातला त्याचा स्वभाव दिसत नाही. म्हणूनच वर्षभरात पत्नी मणी त्याला सोडून जाते. नंतरही कित्येक वेळा तो तिला आपल्या घरी आणण्यासाठी धडपडतो. या कारणावरुन तो मणीच्या आईला दुनियाला खूप काही ऐकवतो. तिला घरातून हाकलून द्या असेही बोलतो. कोणत्याही प्रकारे तो तिच्याकडे सकारात्मक दृष्टीने बघताना दिसत नाही.

अनंताची भेट झाल्यावर तो तिचा खरा पिता आहे हे ऐकून तर आणखीनच त्या कुटुंबावर चिखल फेकतो. मणीला अनौरस, वांझोटी, लफंग्याची मुलगी, अनीतीमान आईची लेक या अर्थी लेखतो. समाजातील इतर जणांसारखीच त्याचीही नजर मणीविषयी तिच्या आई–वडिलांविषयी कडवट झालेली असते. अतिशय रागाने, तोल जाऊन तो दुनियाला "नुसत्या डोक्यावर चढवून ठेवलेल्या, लाडावलेल्या मुली काय समजतात स्वत:ला ? कडू त्या कडू आणि वर ही मिजास!"[४] असे कटू शब्द ऐकवतो.

यावरुन जब्बारचा स्वभाव हा सामान्यातील सामान्य वाटतो. मणीसारख्या व्यक्तीला तिचे स्वत:चे स्वतंत्र स्थान आहे हे मानत नाही. असा संसार उभा राहणे अशक्यच असते. गौरी देशपांडे यांचे हे व्यक्तिचित्र रोजच्या जीवनात भेटणारे आहे. माणूस स्वत:ला माणूस म्हणून घेतो पण ते बऱ्याच अंशी ते माणूसपण दूर ठेवूनच जीवन जगत असतो. हे त्याला माहितही नसते. त्यामुळे त्याला त्याची खंतही नसते हे आणखीनच वाईट. तसाच हा जब्बार आहे. त्याच्या मताला मनीच्या कुटुंबात स्थान नाही. अगदी त्या घरातील कुत्र्या–मांजरांनाही माणसाची पारख आहे जणू. तेही त्याचा आपलेपणाने स्वीकार करत नाहीत असेच जणू लेखिकेला सुचवायचे आहे.

गौरी देशपांडे यांच्या 'उत्खनन' या कादंबरीतील व्यक्तिचित्रणाचा आढावा घेताना, ती पात्रे आपल्याला एका वेगळ्या विश्वात घेऊन जात आहेत असा भास होतो. दुनिया किंवा तिचे आई–बाबाही तसेच तिला भेटलेला दयाळ किंवा मणी ही सारीच पात्रे एका निराळ्याच विचारांची वाटतात. त्यांचे स्वभावधर्म चार चौघांसारखे समाजातील माणसांपेक्षा निराळे वाटतात. प्रत्येकाला एक स्वतंत्र अस्तित्व आहे. स्वत:ला स्वतंत्र असे स्थान आहे असे निश्चित वाटते. तसेच त्यांना भेटलेले अभयाचे कुटुंबही यांच्या विचारांशी बऱ्याअंशी मिळते जुळते आहे. तिची तिन्ही मुले अर्णव, सती, तीर्थकर ही पण या कुटुंबाशी जवळचे नाते सांगणारी आहेत. अर्णव मणीशी लग्नाची इच्छा व्यक्त करतो. पण कधीही जबरदस्तीने तिचे मन वळवण्याचाही प्रयत्न करताना दिसत नाही. तो चित्रकार तसाच कवी पण आहे. मनाने सालस आहे. मणीची व त्याची दाट मैत्री आहे. सती लग्न करुन नोकरी व दोन मुले सांभाळत संसार करत असते. तिर्थकर ही लहान असून मणीवर प्रेम करत असतो. यांच्या प्रेमाला वासनेची दुर्गंधी मात्र कुठूनही येत नाही. या तिघांची आई दुनियाची मैत्रिण अभया ही पण उच्चशिक्षित, नोकरी करणारी स्त्री आहे. नायिकेपेक्षाही तिचे व्यक्तिमत्व तडफदार, धीट दाखवले आहे. मैत्रीच्या नात्याबरोबर दुनियाच्या जीवनात ती अनेक भूमिका वटवताना दिसते.

गौरी देशपांडे यांच्या उत्खननमधील नायिका त्यांच्या स्वभावधर्माशी निकटचे नाते सांगते आहे असे वाटते. त्यांच्या वैयक्तिक जीवनातील विचारांचा परिणाम त्यांच्या लेखनावर झालेला दिसतो. स्त्रीचा मूक आवाज समाजाच्या मनापर्यंत पोहोचवण्याची, त्यांच्या घराण्याची रीत त्यांच्याही रोमारोमातून संचारत आहे असे दिसते. स्त्रीला काय स्थान आहे ? कुटुंबात किंवा समाजातही ते कोणत्या प्रकारे, असायला हवे ? याचेच जणू 'उत्खनन' त्यांनी या कादंबरीत केले आहे असे जाणवते. स्त्रीकडे माणूस म्हणून बघण्याचा समाजाचा डोळा तयार होईल तेव्हाच तिच्या घुसमटीला, वेदनांना अर्थ प्राप्त होईल असेच त्यांना सुचवायचे आहे. विचार करायला लावणाऱ्या,

जीवनाचे दर्शन घडवणाऱ्या त्यांच्या या नायिका उदात्त विचारांच्या आहेत. स्वातंत्र्याला कर्तव्याची जाणीव आहे याची प्रचिती येते.

**संघर्ष :-**

कथा, कादंबरी किंवा नाटक कोणताही साहित्य प्रकार घेतला तरी त्यात संघर्षाशिवाय रसोत्कर्ष होत नाही. अनादी काळापासून मानवाला कथा सांगण्याची किंवा ऐकण्याची हौस, गोडी आहे. कित्येकांना आपल्या जीवनातील किंवा आपण पाहिलेल्या, ऐकलेल्या अनेक घटकांतील ठळक तसेच धाडसी प्रसंगाचे इतरांपुढे इत्यंभूत वर्णन करावे असे वाटत असते. मानवी मन हे अनेकविध धाग्यांची गुंफण असते. साहित्याचा केंद्रबिंदू 'माणूस' हाच घटक असतो. 'जीवन हे नाटक आहे' असे शेक्सपीअर चे विधान खरे मानले तर मानवाला जीवनाच्या पडद्यावर अनेक भूमिका वटवाव्या लागतात. तेव्हा प्रत्येकाच्या स्वभावधर्माप्रमाणे तो त्या पार पाडत असतो. जीवनाच्या वाटेवर त्याला मिळालेली किंवा भेटलेली माणसे विविध गुणवैशिष्ट्यांची असतात. त्यामुळे परस्परांत नात्याचे, संबंधाचे, स्वभावधर्माप्रमाणे अनेक थर असतात. हे सगळे थर उघडत त्याला जीवन जगत रहावे लागते.

जीवन म्हटले की कुटुंब, समाज रचना आलीच. मानवी जीवनात या घटकांना अमोल स्थान आहे. परमेश्वराने प्रत्येक व्यक्तीचे बाह्य व्यक्तिमत्व निराळे बनवण्यात जसे कौशल्य वापरले आहे, तसे अंतर विश्वातही त्याने कौशल्याने बदल ठेवला आहे. व्यक्तिगणिक त्याची वृत्ती-प्रवृत्ती बदलत असते आणि हीच मानवी जीवनातील खरी कसोटी आहे. प्रत्येकाचे रंग - ढंग - छंद सारे निराळे असते. त्यामुळेच मानवी जीवनाची रंगत वाढते. एवढेच नव्हे तर एकाच व्यक्तीची दोन वेगवेगळी मनेही असतात. त्याच्या एकट्याच्या मनातही द्वंद्व असते. म्हणजे संघर्ष हा जीवनाची रंगत वाढवत असतो. म्हणूनच साहित्याचा तो जीव असतो. त्यामुळे साहित्यात चैतन्य निर्माण होते. दुःख, संकटे, विरोध हे सारे समोर येते तेव्हा सुखाची, सहकार्याची किंमत कळते.

वास्तव जीवनात ही आपल्याला अनेक स्वभावाच्या व्यक्ती भेटतात. कधी कुणाशी आपला सूर जुळतो तरी कधी त्याच्या संगतीत तो बेसूर होतो. तसेच जेथे विरोध असतो, प्रतिकाराची भावना असते तेथे संघर्ष संभवतो व त्यातूनच कादंबरीत कथानकात रंग भरायला सुरवात होते. संघर्ष हा कुटुंबांतर्गत ही असतोच असतो. एका कुटुंबातील सर्व व्यक्तिसारख्या स्वभावाच्या कधीच नसतात. अगदी एका आईच्या पोटी जन्म घेतलेली चार भावंडेही पुरेपूर सारख्या स्वभावाची, आवडी-निवडीची नसतात हे आपण पाहतोच. ती वेगळया स्वभावाची मत-मतांतरांची असल्यामुळे जीवनात, कुटुंबात संघर्ष निर्माण

होत असतो. हा संघर्ष माणसाला कितीही कटकटीचा, त्रासदायक वाटला तरीही एका अर्थी माणसाला तो जीवनाचे धडे, शिकवण देत असतो. त्यातूनच मानवाचे आयुष्य घडत जाते. सगळीच माणसे एका विचाराची असती तर जीवन रंगहीन, रुचीहीन झाले असते. इतके जीवनात म्हणजे पर्यायाने साहित्यात संघर्षाला महत्व आहे.

अगदी रामायण, महाभारतासारख्या उदात्त, त्याग आदी दैवी गुणांनी युक्त असलेल्या कथा जरी घेतल्या तरी त्यातही रंजकता आणली आहे ती संघर्षानेच आणि म्हणूनच इतक्या वर्षानंतर आजही त्या आपल्या अंत:करणाचा ठाव घेतात.

माणूस मग तो कसाही असो त्याच्या जीवनात संघर्ष हा असतोच. त्याच्या तऱ्हा व्यक्तिपरत्वे बदलत जातात एवढेच. राम–कृष्णापासून संत–ऋषी किंवा राजे–महाराजे, देशभक्त असो किंवा सर्वसामान्य मानव असो. त्याच्या जीवनात संघर्षमय परिस्थिती होती. प्रत्येकाला बाह्य परिस्थितीतील संघर्षाबरोबर अंतस्थ संघर्षाला सामोरे जावे लागते. हे संघर्ष अचूक हेरुन कथानकात गुंफायला लागते ते संवेदनशील मन. मनुष्य स्वभावाची, सूक्ष्म ओळख कथाकाराला करुन घ्यावी लागते. त्यांच्या अंतरंगात उमटणाऱ्या सुख–दु:खाच्या लहरीचे जवळून दर्शन केल्याशिवाय कथाकाराला त्या लहरीतील स्पंदने इतरांच्या हृदयापर्यंत पोहचविता येणार नाहीत.

संघर्षाविषयी विवेचनात बाल शंकर देशपांडे म्हणतात, ''कादंबरी म्हटली की संघर्ष आलाच. मग तो संघर्ष मनुष्य व बाह्यविरोधी शक्ती यांच्यातला असेल, मनुष्यामनुष्यातला असेल, मनुष्य आणि सामाजिक परिस्थिती यांच्यातील असेल, मनुष्य आणि नियती यांच्यातला असेल, किंवा त्याच्याच अंतस्थ विचारविकारा मधला असू शकेल. मनुष्याला अंतस्थ अगर बाह्य संघर्षाला सामोरे गेल्याशिवाय गत्यंतर नाही आणि याच शाश्वत सत्यावर कादंबरी सृष्टीची उभारणी झालेली असते.''[५] यावरुन साहित्यातील संघर्षाचे महत्व आपल्याला पटते.

गौरी देशपांडे यांच्या उत्खनन या कादंबरीत ही जिज्ञासा, संघर्ष हे घटक कादंबरीची रंजकता वाढविताना दिसतात. मुख्य म्हणजे त्यांच्या कादंबरीतील नायिका ह्या समाजातील रूढी, परंपरा, रिती, रिवाज यांच्या विरोधी आहेत. त्यांच्या प्रत्येक कादंबरीत स्त्री ही उच्चशिक्षित आहे. आहे. नव्या वाटा, उजळलेल्या दिशा तिला खुणावत आहेत. समाजात ती स्वत:ची जागा शोधत आहे तसेच आपले अस्तित्व घट्ट रोवण्याचा प्रयत्न करत आहे. या साऱ्या पाठीमागे तिचा एकच भाव आहे, मी माणूसच आहे व मलाही आपली म्हणा म्हणजे मानवाचे सारे अधिकार, हक्क माझ्याही वाटयाला

येऊ द्यात. त्यापासून मला वंचित ठेवू नका. दुसरे म्हणजे मला स्वतंत्र बुध्दी आहे, स्वत:ची विचारांची बैठक आहे. माझी स्वत:ची स्वतंत्र ओळख आहे. मग मी दुय्यम स्थानावर का ? अशी तिची मनोभूमिका असल्यामुळे तिचा संघर्ष हा कुटुंबातील काही नात्यांशी कधी समाजाशी तर कधी स्वत:च्याच मनाशी असतो असे दिसते.

आत्मभान आलेली त्यांची नायिका फक्त वैयक्तिक कौटुंबिक पातळीवरच संघर्ष करत नाही. तर ती समाज घटकांविरोधीही संघर्षाचे वातावरण निर्माण करते. कोणत्याही पातळीवरील संघर्षाला सामोरे जाण्यास सज्ज राहते.

उत्खननमधील नायिका दुनिया ही कॉलेजमध्ये असताना, लग्नाआधी आई होते. तिचा प्रियकर अनंता 'स्व'ला फुटणारा धुमारा टाळतो. पण ही तशाही अवस्थेत बाळाला जन्म देण्याचे ठरवते. तेव्हा तिच्याही मनात आई, वडिल, समाज यांच्याविषयी थोडी तरी भिती वाटली असेलच. तिच्याही मनात काही काळापुरते तरी द्वंद्व निर्माण झाले असेलच. पण ती स्वत:च्या मनाचा आवाज ऐकते. तिचे आई-बापूही समाजाच्या विरोधाला सामोरे जाण्याचे ठरवतात. समाज म्हटले की मतांचे प्रवाह असणारच. आपल्याला जे योग्य वाटते त्या दिशेने जाण्याचे धाडस सर्वांच्या ठिकाणी नसते. पण दुनिया व तिचे आई-वडील स्वत: निवडलेल्या मार्गाने जाण्याचे निश्चित करतात. समाजाने त्यांना वाळीत टाकले, त्यांच्यांशी सर्वप्रकारचे संबंध तोडले, अनेकांचे त्यांच्याकडे येणे-जाणे बंद झाले. तरीही हा विरोध पत्करुन त्यांनी मणीला जन्माला आणलीच. आपण आपल्या जीवनाच्या दिशा ठरवताना परिस्थिती, वस्तुस्थिती, प्रसंग पाहून ठरवले तर ते योग्य ठरते. समाजाच्या कलांनी आपल्या जीवनाचा मार्ग ठरवणे हे सोयीस्कर नव्हे हेच लेखिका सूचित करते. कुमारी माता होणे तसेच समाजाच्या दृष्टीने अनीतीमान होणे आणि त्यामुळे नायिकेचे कुटुंब व समाज असा संघर्ष अवतरतो. अशा संघर्षाला सामोरे जाण्यासाठी आत्मबळाबरोबरच जवळच्या आपल्या माणसांच्या आधाराचे पाठबळ ही असावे लागते. असे म्हणून लेखिका नात्यातील बंधाचे घट्टपण सिध्द करते.

मणीचा जन्म संघर्षमय वातावरणात झाला असला तरी त्याचे उमटणारे पडसाद समाजापेक्षा नायिकेच्या जीवनावर दाट स्वरुपात उमटू शकणार होते. समाजभयाने तिने मणीला जन्म दिला नसता तर कदाचित तिच्या जीवनात एक अनोखी पोकळी निर्माण झाली असती. कदाचित तिचे जीवन नीरसही झाले असते. आयुष्यभर तिला तिच्या स्वत:च्या मनाशी लढत राहण्या पलिकडे काही करता आले नसते.

समाजाने तिचे दु:ख, मनाची पोकळी कशाने भरुन काढली असती ? मुखवट्याच्या या बेगडी दुनियेत दुनिया व तिच्या कुटुंबाने घेतलेला निर्णय योग्य आहे असे वाटल्याशिवाय रहात नाही.

तिचा मित्र जबाबदारी टाळून, तिला आईपण बहाल करुन गेल्यामुळे तिच्या जीवनात हे संघर्षमय वातावरण निर्माण झालेले असते. तेव्हा तिचा संघर्ष मी स्त्री आहे, माझ्या वाट्याला हे आईपण आले तरी ते याच समाजातील पुरुषाने दिलेले आहे. माझ्या आयुष्यात होणाऱ्या घडामोडींचा, येणाऱ्या बऱ्यावाईट क्षणांचा स्वीकार किंवा अव्हेर करणे हे सर्वस्वी माझ्यावर अवलंबून आहे असेच जणू ती समाजाला सांगते आहे.

या समाजविरोधी भूमिकेचे परिणाम तिला दीर्घकाळ सोसावे लागतात. पण तिची तिला खंत नाही. एकदा एखादी गोष्ट करण्याचे किंवा एखादी घटना मान्य करण्याचे स्वीकारले की मग त्याच्या परिणामांना सामोरे जाण्याचे अंगी बळ येतेच. तसे मणी अनंताची मुलगी आहे हे जेव्हा जब्बारला कळते तेव्हा तो दुनियाला खूप काही ऐकवतो. मणीला अनौरस, वांझोटी, अनीतीमान आईची लेक अशी दूषणे देतो. पण या साऱ्या शब्दांच्या वर्षावाचा दुनियाच्या मनावर काहीही परिणाम होत नाही. याचा अर्थ असा ती खरेच अनीतीमान असते किंवा निर्लज्य असते असा नव्हे. हे सारे शब्द तिच्या कानातून मनावर आघात करतात ही पण त्याचा विपरीत परिणाम ती मनावर होऊ देत नाही. कारण मणी ही मणी आहे. ती स्वतंत्र माणूस आहे तिचे स्वत:चे अस्तित्व आहे. मग तिचा जन्म कसा झाला यापेक्षा तिच्या अस्तित्वाशी काय संबंध असे ती म्हणते. शिवाय मणीचा जन्म हा समाजाला मान्य नसला तरी तिला व तिच्या कुटुंबाला मान्य असतो एवढे तिला पुरे असते. तिच्या मनाशी ती प्रामाणिक असते. संघर्ष हा कोणाशी तरी करावाच लागला असता. समाजाचे ऐकून स्वमनाशी किंवा मनाचे ऐकून समाजाशी. जास्ती हिताचे किंवा आपला स्वभावधर्माप्रमाणे ती स्वमनाचे ऐकते. त्यात ती समाधानी असते म्हणून ती जब्बारचे कडवे बोल ऐकून विचलित होत नाही.

उच्च मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेली दुनिया स्वत:ही उच्चशिक्षित असते. देशा बाहेरच्याही हवेचा संसर्ग तिच्या विचारांना झालेला असतो. तिथले जग तिने जवळून पाहिलेले असते. तिला आपल्या आई-बापूंचा भक्कम पाठिंबा असतो. एवढे बळ तिला समाज संघर्षाला सामोरे जाण्यास पुरेसे असते.

मणीचा जन्म झाला तेव्हाही तिने याच बळावर समाजाच्या संघर्षाचे वादळ परतवले होते. मणीचे जीवन भले संघर्षातून उदयाला आले असले तरी त्या संघर्षाने नायिकेच्या जीवनात ओघाने कादंबरीतही चैतन्य भरले आहे. तिच्या जन्माने दुनियाला तसेच आई-बापूंनाही नवचैतन्य मिळते.

उत्खननमध्ये गौरी देशपांडे यांनी दोन प्रकारचे संघर्षाचे स्वरूप प्रकट केले आहे. दुनिया ही कादंबरीची नायिका. तिच्या जीवनात लहान वयातच संघर्षाचा प्रसंग येतो. अठरा-एकोणीस वर्षाच्या वयातच तिला समाजाशी संघर्ष करावा लागतो. पुढे जाऊन तिची मुलगी मनकर्णिका हिला आपल्या पतीशी व सासरच्या कुटुंबाशी संघर्षाला सामोरे जावे लागते. मणी ही दुनिया व अनंताची मुलगी असते. बालपणीच तिला दयाळचे पितृछत्र लाभते. तिचा जन्मदाता तिच्या जन्माआधीच तिच्या आईच्या आयुष्यातून निघून गेलेला असतो. दयाळला स्वीकारण्याची जबाबदारी येते तेव्हा तिचा तिच्याच मनाशी संघर्ष असतो. त्याला पिता या नात्याने स्वीकारावे कि नको असे द्विधा मन:स्थितीत ती फार काळ राहिलेली मात्र दिसत नाही. दयाळला वडील या नात्याने तिने मान्य केलेले दिसते. म्हणजे बालपणापासूनच तिच्यातील वैचारिक पातळीची चुणूक लेखिकेने स्पष्ट केली आहे.

ती अत्यंत हुशार असते. न्युरोसर्जन होते. तिच्या आयुष्यात जब्बार येतो. वर्षभर त्यांचा संसार ठीक असतो. नंतर जब्बार तिचेकडून मुलाची अपेक्षा व्यक्त करतो. तेव्हा मात्र खऱ्या अर्थाने मणीच्या जीवनात संघर्ष अवतरतो. स्त्रीचा जन्म हा केवळ पती-मुले यांच्यासाठीच आहे हे तिला मान्य नसते. तिने आपली बुध्दी आपले कौशल्य पतीची सेवा व मुलांचे संगोपन एवढ्यासाठीच खर्च करावे या भूमिकेच्या अगदी विरुध्द असते. तिनेही आपली कुशलता, बुध्दीचा विकास करावा. चिमणी कावळ्यासारखे घरट्यातले जीवन जे परंपरेने चालत आले आहे ते धिक्कारुन गरुड झेप घ्यावी. चारी दिशांना तिच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदाव्यात. समाजात तिचे काही स्वतंत्र स्थान असावे आणि हे सारे ती करु शकते यावर तिचा विश्वास असतो. तिने ते स्वत: सिध्द केलेले असते. माझ्याही हृदयात ममता आहे. वात्सल्य आहे. ते देण्या-घेण्याची इच्छा व क्षमता आहे. पण तेवढे व तेवढ्याचसाठी माझे आयुष्य नाही हा तिचा आवाज आहे. आजच्या नवशिक्षित स्वत:च्या स्वत:ला ओळख पटलेल्या स्त्रीची परंपरेने स्त्रीपण लादलेल्या, मान्य केलेल्या स्त्रीला ही चपराक आहे. आणि इथेच संघर्ष सुरु होतो. हा संघर्ष फक्त पती-पत्नी मधील दिसत असला तरी लेखिकेने तो फक्त तेवढ्यासाठीच उभारलेला नाही. हा संघर्ष रूढीचा, परंपरागत पध्दतीचा, पुरूष व स्वत:ची, स्वत्वाची ओळख पटलेली स्त्री या मधला आहे असेच दिसते. अजुनही पुरूषाच्या मनात स्त्री विषयी स्त्री कितीही शिकली, समाजात तिचे स्वतंत्र स्थान असले, समाजाला तिच्या विशेष ज्ञानाची गरज असली तरी हे सारे दुय्यम ठरते. प्रथम ती मणी आहे व माझ्या बाळाची आई तिने व्हायलाच हवे असा पुरुषी हेका असणारा जब्बार दिसतो. त्याच्या विचारांची पातळी सर्वसामान्यांप्रमाणेच असते. मी , माझे कुटुंब एवढ्यातच तो घोटाळत असतो. अनंताच्या भेटीनंतर तर दुनियाला व मणीला अगदी टोकाचे बोलतो व त्यांच्याविषयी तिरस्काराची भाषा बोलतो. एकूणच

त्याच्या मनात स्त्री व पुरुष असा भेद अजूनही जिवंत आहे असे दिसते. त्याच्या अगदी उलट परिस्थिती मणीच्या घरा–मनात असते. तिच्या जन्माआधीपासून समाजाशी संघर्षाला सामोरे जाण्याची जणू त्यांच्या घराला सवय असते. तिचे आजी–आजोबापासून त्यांची स्वत:ची स्वतंत्र मते असतात. त्या वातावरणात वाढलेल्या मणीला जब्बारचे विचार संकुचित वाटतात. तिचे यशस्वी, आकाशात उंच भरारी घेणारे पंख छाटणारे वाटतात. पण पंख छाटणारे विचारांचे वारेही ती आपल्या आसपास फिरकू देत नाही. समाजातले आपले स्थान कोणत्याही परिस्थितीत, कोणासाठीही ढळू देण्याची तिची तयारी नसते. मूल होऊ देण्याच्या ती विरोधी नसते. पण त्याच्या संगोपनासाठी लागणारा वेळ देण्यास ती तयार नसते. माझं कुटुंब, माझा पती, माझं मूल, मी या वलयाच्या किती तरी बाहेर गेलेली असते. असा संघर्ष गौरी ताईंनी रंगवून कादंबरीत रंजकता भरली आहे. काही क्षण वाचकांचेही मन विचलित होते.

गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील स्त्री ही स्वत:विषयी आत्मसन्मान बाळगणारी असली तरी आत्ममग्न दिसत नाही. तिचे विचार वास्तविक स्वार्थाच्या कक्षा ओलांडलेले आहेत. ''व्यक्ती म्हणून जगताना नात्याच्या चाकोरीबध्द कल्पनेतून मुक्त होणे हे अत्यंत अवघड आहे.''[६] असे मत ''मिळून साऱ्याजणी'' मध्ये नीलिमा पालवणकर (ठाणे) यांनी मांडले आहेत. कारण सर्वसामान्यपणे लोक नाती, रिती, जपत चाकोरीतून बाहेर न पडता ती सांभाळत जीवन जगत असतात. पण गौरी देशपांडे यांच्या नायिका यापेक्षा भिन्न वाटतात. व्यक्ती म्हणून जगताना पडणाऱ्या प्रश्नांचा त्या सतत शोध घेत राहतात आणि त्यामुळेच त्यांना नेहमी स्वत:शीही संघर्ष करावा लागतो. त्यांच्या वृत्ती–प्रवृत्ती चाकोरीतून बाहेर पडून जगाची व्यापकता समरसून कवटाळतात. त्यांची नायिका, कामावरची निष्ठा, प्रेम इत्यादी मूल्यांनाही आपल्या जीवनात व्यापक रूप देतात. नात्याच्या ठराविक कल्पना त्यांची पात्रे नाकारतात. समाजाची स्त्रीकडे, नात्यांतील संबंधाकडे, परस्परांतील प्रेमभावना याकडे बघण्याची दृष्टी बदलण्याची किती आवश्यकता आहे याचीच ग्वाही जणू त्यांची पात्रे देत आहेत.

कथा, कादंबरी, नाटक कोणत्याही साहित्य प्रकारामध्ये माणूस या घटकाला अतिशय महत्व असते. माणूस म्हटला की प्रत्येकाचा स्वभाव निराळा, अंगी असणारे कला–गुण, वृत्ती–प्रवृत्ती सारे बहुतांशी निरनिराळे असते. तसेच माणसाच्या जीवनात येणारा संघर्षही व्यक्तिपरत्वे भिन्न असतो. कोणाला स्वत:शीच, कोणाला समाजाशी, कोणाला स्वत:च्याच कुटुंबाशी संघर्षाला तोंड द्यावे लागते.

त्याचप्रमाणे माणूस म्हटले की भाषा ही आलीच. प्रत्येकाची, प्रत्येक समाजाची, प्रत्येक राष्ट्राची व्यक्ती, स्थल, कालानुरूप ती बदल गेलेली दिसते. जसे तिचे स्वरूप भिन्न दिसते तसे ती बोलणाऱ्याची

पध्दतही भिन्न असते. प्रत्येकाची तिची फेक करण्याची पध्दत भिन्न असते. माणसाने बुध्दिच्या शक्तीवर भाषा प्रगत केली. तो बोलू शकतो, त्याला लिपी अवगत आहे, हेच त्याचे इतर प्राण्यापेक्षा वेगळेपण आहे.

प्रत्येकाची भाषा निराळी असते. स्वभावावरही त्याची भाषाशैली अवलंबून असावी. काहींना उपजत विनोद बुध्दी लाभलेली असते. काहींच्या जीवनात जन्मापासूनच संघर्ष, वेदना पेरलेल्या असतात. परिणामस्वरूप त्यांच्या भाषिक व्यापारात, ती बोलण्याच्या पध्दतीत त्या गोष्टींचा प्रभाव जाणवतो.

अशा अनेक घटकांचे साहित्यिकांला ज्ञान असते आणि त्या साऱ्या गोष्टीच्या अवलोकनातून लेखक त्या त्या व्यक्तिची भाषा व्यक्त करत असतो. साहित्य कोणत्या प्रदेशातील आहे, ते कोणत्या वयाच्या तसेच कोणत्या स्वभावाच्या व्यक्तीच्या अनुषंगाने चित्रित केले आहे, त्याप्रमाणे लेखकाला भाषाशैलीचा वापर करावा लागतो. व्यक्तीची आर्थिक परिस्थिती कसल्या प्रकारची आहे, त्याचे शिक्षण कुठपर्यंत झाले आहे एवढेच काय, त्याचे बालपण कोणत्या प्रदेशात, कुटुंबात गेले आहे यावरही त्याच्या भाषेची शैली अवलंबून असते.

एकूणच व्यक्ती स्थळ, काळ, स्थितीपरत्वे भाषाशैली बदलत असते हे पूर्णपणे जाणून लेखकाने तशी संवाद रचना केलेली असते. व तसे नसल्यास त्या कथानकात विसंगती निर्माण होईल असे वाटते. घरातील मालकीण आणि मोलकरीण यांच्या बोलण्याच्या पध्दतीत भाषाशैलीत फरक असणे स्वाभाविक आहे व वाचकाला तेच अपेक्षित असते.

याच धर्तीवर लेखक प्रादेशिक कथानकात त्या त्या प्रदेशाची भाषा वापरुन कथानकाची रंजकता वाढवतात. उदा. ग्रामीण लेखक खेडेगावातील, शेतकरी कुटुंबांची भाषा वापरतात. खानदेशी, कोकणी भाषेतील साहित्य आपला स्वतंत्र व वेगळा ठसा उमटवते. त्या प्रादेशिक साहित्याचे वेगळेपण तेथील लोकांचे स्वभाव तिकडचे निसर्ग वर्णन आदी गोष्टींना निराळे वाटत असले तरीही प्रत्येकाची निराळी भाषाशैली या महत्वाच्या घटकामुळे खास करुन त्या त्या प्रदेशाचा निराळा ठसा वाचक मनावर उमटतो.

भाषाशैली ही व्यक्तित्वाशी सुसंगत असायलाच हवी. ती विसंगत असल्यास कथानकाची रसहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भाषाशैलीबाबत दुसरीही एक महत्वाची बाब म्हणजे भाषा अलंकृत करणे. काही जण ती अगदी सजवून मढवून सादर करतात तर काहीजण अगदी सोप्या सरळ सहज पण ओघवती शैली वापरुन कथानाकची रंगत वाढवतात. याबाबतीत 'बाल शंकर देशपांडे' यांचे मत असे आहे की, ''कादंबरीची भाषा ही प्रसंगानुरुप गंभीर, खेळकर, मिस्किल, खटकेबाज, चुरचुरीत

किंवा पल्लेदार असली पाहिजे. अलंकारामुळे भाषेला शोभा येते खरी पण तिचा वापर तारतम्यपूर्वक व्हावला हवा.''[७] हे त्यांचे मत विचारात घेण्यासारखे आहे.

अलंकाराच्या ओझ्याने कादंबरीचा मूळ आशय गुदमरुन गेला तर तेही योग्य होणार नाही. उलट एखाद्याची ओघवती पारदर्शक सहजता असलेली भाषाशैलीच वाचकमनाचा वेध घेते.

गौरी देशपांडे या उच्चशिक्षित कुटुंबातील स्वत:ही उच्चशिक्षित स्त्री आहेत. लेखक जे जग जवळून बघतो, ज्या परिस्थितीत वाढतो, तसेच त्याचे स्वत:चे विश्व तयार होत असते. त्या विश्वात जीवन जगत असताना आलेले अनुभव, भेटलेल्या व्यक्ती, त्यांचे राहणे, स्वभाव, भाषा आदींचेच कथन तो कथानकातून करत असतो. गौरीताईंच्या साहित्यातील स्त्री ही स्वत:विषयी आत्मभान आलेली, शिक्षणाने प्रबळ झालेली, कोणत्याही बाबतीत मनाशी, स्व मताशी प्रामाणिक असणारी अशीच आहे आणि त्या अनुषंगाने आलेली तिची भाषा ही सजग, सजाण, नागरी अशीच आहे. देशा-परदेशात त्यांचे सततचे जाणे-येणे चालू असायचे. देशाबाहेर अनेक देशात त्यांचे वास्तव्यही असायचे. परिणामी इंग्रजी शब्द त्यांच्या साहित्यात डोकावताना दिसतात.

उत्खनन ही त्यांची शेवटची कादंबरी. या कादंबरीमध्ये नायिका निवेदन करते आहे. प्रथम पुरुषी निवेदन पद्धती स्वीकारुन लेखिकेने कादंबरी वाहती ठेवली आहे. भाषाशैलीचा विचार करायचा म्हटले तर प्रत्येक पात्र स्वभावाप्रमाणे सुसंगत पध्दतीने लेखिकेने संवादाची फेक केली आहे. नायिकेचे सारे कुटुंब उच्चशिक्षित आहे. तिचे ज्या घराशी जवळचे मैत्रीचे नाते आहे. तेही कुटुंब तसेच उच्चमध्यमवर्गीय आहे. शिकून नोकरी करणाऱ्या स्त्रिया आहेत. त्यामुळे सर्वांची भाषाही तशीच नागरी उच्चमध्यमवर्गीय वळणाची आहे. इंग्रजी वाक्ये सर्वांच्याच तोंडी आहेत कारण प्रत्येकजण ती जाणणारा आहे. कादंबरी वाचताना त्या वातावरणाशी समरस होण्याची क्षमता त्यांच्या संवादातून निर्माण होत. जमना-सखाराम हे घरातील नोकर माणसे. त्यांची भाषा मात्र त्यांच्या नोकरीला साजेशी अशीच आहे.

कादंबरीतील प्रत्येक पात्राच्या स्वभावाशी सुसंगत अशीच त्या पात्राची भाषा आहे. अभया ही दुनियाची मैत्रीण प्राध्यापकाची नोकरी करणारी आहे. दुनिया पेक्षाही ती सडेतोड स्वभावाची आहे. दुनिया एखाद्या बाबतीत मागचा पाय घेणारी वाटते. सहकाऱ्यांना समजून घेणारी वाटते. तिच्या समजूतदार स्वभावाला संगत करणारी तिची भाषाही तशीच मनमिळावू सहज वाटते. आपला संसार आपण एकटीने कुठे केला. तो अनेकांनी मिळून केला. हे सांगताना ती नम्रपणे आपला संसार ठीक चालण्याचे श्रेय सर्वांना देते. कुठेही विनाकारण वादंग, त्रागा तिच्या भाषेतून व्यक्त होत नाही. जब्बार

मणीला अगदी टोकाचे बोलतो. त्यांना दूषणे लावतो. तेव्हाही तिची भाषा आपली मर्यादा सोडत नाही. सहजतेने त्याने उठवलेले शब्दाचे वादळ संयमाने परतून लावते. जब्बार हा मानी. काहीसा पुरुषी अहं जोपासणारा वाटतो. त्याची भाषाही तशीच उद्धट, तापलेली वाटते. दुसऱ्याची मानसिकता समजून घेण्याची त्याची मन:स्थिती नसते. त्यामुळे दुनिया, अनंता व मणी यांच्या विषयीचा तिरस्कार त्याच्या शब्दातून बाहेर पडताना दिसतो. दयाळ हा उच्चशिक्षित न्यूरोसर्जन असतो. माणसाच्या शरीरा-मनासंबंधी त्याचे निराळेच तत्वज्ञान असते. त्याची जीवनाकडे बघण्याची दृष्टी मात्र सकारात्मक दिसते. पुरूष असूनही अतिशय निर्लेप मनाचा खेळकर प्रवृत्तीचा, गुणदोषासह आपल्या माणसांचा स्वीकार करणारा असा आहे. त्यामुळे त्याची भाषाही तशीच खेळकर, सहज सुंदर आहे. त्याच्या भाषेतून आत्मविश्वास, स्पष्टपणे डोकावतो पण त्यामध्ये आत्मप्रौढी कुठेही दिसत नाही. मणीची भाषाही समजूतदार वळणाची आहे. ती उपजतच समजूतदार, हुशार, प्रेमळ आहे. सुंदरता, बुध्दिमत्ता यांचे मुबलक दान मिळूनही त्याचा गर्व मात्र तिच्या शब्दातून कधीही बाहेर पडत नाही. कारण तिच्या स्वभावात योग्यायोग्यतेची जाण आहे. सत्याशी ती एकनिष्ठ आहे पण खोटा दंभ तिच्या मनात नाही. मनीकडून मुलाची अपेक्षा केली जाते तेव्हा ती म्हणते, '' माया करायची, माया लावून घ्यायची भूक मलाही आहे, पण ती फक्त जन्मदात्या आई-बापांसाठी, पोटच्या पोरांसाठी राखून ठेवणार नाही.''

अनंता भेटल्यावर मणी व दयाळ त्याचे स्वागत करतात. त्याच्या आजाराविषयी स्पष्ट मत मांडतात. त्याने ऑपरेशन करुन घ्यावे असे सांगतात. या साऱ्यामध्ये त्याच्या पोटातील संयम, समजूतदारपणा, डॉक्टर या नात्याने त्यांचा आत्मविश्वास हे सारे गुण त्यांची भाषा सहजपणे पेलताना दिसते. कुठेही उपरेपणा, परकेपणा, तिरस्कार, उगीचच उपकार केल्याचा भाव डोकावत नाही. अभयाच्या स्वभावाशी साजेशी भाषा तिच्या मुखातून व्यक्त होते. अर्णवही मनमिळावू, प्रेमळ मुलगा असतो. मणीवर त्याचे प्रेम असते. पण तो संयमी मनाचा, कवीमनाचा असल्यामुळे कधीही प्रेम शब्दातून व्यक्त करताना दिसत नाही. अनंताची भाषा ही त्याच्या निराळ्याच विश्वाची गूढ आहे. त्याचे जीवनच सहज नाही. गूढ वाटते, दुनिया, मणीवर तो हक्काची, अधिकाराची भाषा वापरत नाही. दुनियावरील विश्वास मात्र त्याच्या शब्दातून व्यक्त होतो.

गौरी देशपांडे यांनी व्यक्तींचे स्वभाव व त्याला सुसंगत अशी भाषा त्याच्या मुखी घालून कादंबरीची रुची वाढवली आहे. स्त्री म्हणून कुठेही हळवेपणाची किंवा लाचारीची भाषा त्यांच्या नायिका बोलत नाहीत. आत्मभान आलेली, स्वत:ची ओळख पटलेली स्त्री तिला शोभेल असेच आपले वर्तन व वक्तव्य करते.

त्यांची भाषा अलंकाराने फार नटलेली दिसत नाही. पण योग्य तेथे उपमा, प्रतिमा व अनुप्रास आलेला दिसतो. मुळातच गौरीताईंचे मन, दागिने, कपडे, साड्या अशा स्त्रीसुलभ वस्तुत गुंतलेले दिसत नाही. त्यांच्या मनातील सहजता, सरळता त्यांच्या शब्दातून डोकावते. काही ठिकाणी छोटी वाक्ये केलेली दिसतात. पण बऱ्याच ठिकाणी लांबच लांब वाक्यरचना त्यांच्या भाषेने लीलया पेललेली दिसतात. चार-पाच ओळींचे एकच वाक्य असते. पण ते अशा काही पद्धतीने जोडलेले असते की वाचताना दमछाकही होत नाही व रसहानीही होत नाही. हे त्यांच्या भाषेचे विशेषत्व आहे हे मान्य करावेसे वाटेल. उदा. ''तेव्हा तरी मी जाऊन निर्धास्त झोपलेली नाही ? पण तोपर्यंत झोपेचे खोबरे झालले असे, तेव्हा चुळबुळत बिछान्यात पडून तो करीत असलेल्या 'कामांचा' आढावा घेई आणि इस्त्रीचा बोर्ड 'आमच्या'खोलीत असल्याने तो येऊन इस्त्री करायला लागल्यावर उगीच अपराधीपणाने झोपेचे ढोंग करी किंवा मी खरे तर जागीच आहे हे बघून नेहमीच्या बडबडीच्या आवडीनुसार तो गप्पा करायला लागला तर, तो 'काम' करतोय आणि आपण फुका लोळतोय या जाणीवेने मला तो काय म्हणतो ते ऐकू पण यायचे नाही ! बरे, हे सारे मी हसत त्याला सांगवे की नाही ? पण हे सारे किती मूर्खपणाचे आहे आणि तो त्याची किती खात्री करील याची कल्पना असल्याने तेही कधी केले नाही .''[८] अशा प्रकारे गौरी देशपांडे यांची भाषा शैली प्रसंगाला उठाव आणणारी वाचक मनाचा ठाव घेणारी आहे. अलंकारानी फार सजलेली नाही. मात्र ओघवती आहे. साधेपणातच त्यांच्या भाषेचे सौंदर्य दडलेले आहे.

**स्त्रीवाद :-**

'स्त्रीवाद' या संकल्पनेचा नेमका अर्थ किंवा त्याची अचूक व्याख्या अनेकांना कळलेली नाही. त्यामुळेच स्त्रीवाद म्हणजे नेमके काय ? किंवा स्त्री मुक्ती म्हणजे नेमकी कोणापासून मुक्ती ? असेही प्रश्न अनेकांनी उभे केले आहेत. स्त्रीवादाची संकल्पना आपल्याकडे १९६० नंतर आली. ती पाश्चात्यांकडून आपलेकडे आली असे अनेकांनी मत मांडले आहे. ठराविक मर्यादेपर्यंत त्यात सत्यता आहे. पण त्याच्याही पुढे जाऊन या प्रश्नाच्या अगदी मुळाशी जाऊन विचार केला तर काही गोष्टी आपल्याला मान्य कराव्या लागतात. त्या म्हणजे मूळ स्त्री पुरुष समानता ही आपल्याकडेही होती. वैदिक काळापासून पुढे कित्येक वर्षे स्त्रीला अनेक बाबतीत समानतेचा दर्जा दिलेला होता. तिच्या विचारांना, मतांना, कार्यकुशलतेला आदराचे स्थान होते. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही आर्यांनी स्विकारलेली पध्दत एकट्या पुरुषांसाठीच लागू नव्हती. समस्त मानव जातीसाठी ते बंधनकारक असावे . मनन करणारा प्राणी तो माणूस. मग त्यामध्ये स्वतंत्रपणे स्त्री किंवा पुरुष असा वेगळा उल्लेख केलेला नव्हता. पण नंतर त्या गोष्टींचे विडंबन झालेले असावे. रामायण काळात राम वनात जायला तिघाला तेव्हा सीता राज्य

सांभाळील असे उद्‌गार वशिष्ठादि ऋषींचे आहेत हे आपल्याला माहीत आहे. यावरुन रामाऐवजी सीता ही राज्याची अधिकारी आहे किंवा तिची बौध्दिक, वैचारिक क्षमता तेवढी आहे असा विश्वास व आदरही तिच्या विषयी होता हे आपणाला मान्य करावे लागते.

स्त्रीवाद ही संकल्पना एकाच विचारप्रणालीतून निर्माण झालेली नसल्यामुळे तिला ठराविक व्याख्यांच्या चौकटीत बसवणे अशक्य आहे. स्त्रियांच्या व्यक्तित्वाची, स्वत्वाची, निर्णयाची झालेली घसरण टाळणे हा मूळ हेतू या संकल्पनेमागे आहे. या संकल्पनेत स्त्री–पुरुष समानता, स्वातंत्र्य, स्वतंत्रता, तिचा आत्मसन्मान आदी गोष्टींना प्राधान्य दिले आहे. फक्त कायदे करुन, कागदी घोडे नाचवून ही इतकी वर्षे रुजलेली, समाज मनावर घट्ट बसलेली धूळ सहजासहजी साफ होणार नाही. त्यासाठी समाजमनाची मानसिकताच बदलायला हवी. स्त्रीकडे बघण्याचा तिचा स्वभाव व समाजाचा दृष्टिकोन बदलण्यासाठी समाजात व कुटुंबातही जागृती घडवून आणणे, संवेदनशील मनाने त्याकडे बघणे, व ती परिस्थिती बदलण्यासाठी जाणीवपूर्वक विचार व कृती करणे म्हणजे स्त्रीवाद. म्हणजे मानसिक, शारीरिक, आर्थिक, शैक्षणिक अशा सर्व अंगांनी स्त्रीचा व्यक्ती म्हणून विचार स्त्रीवादा मध्ये येतो.

तुकाराम शिष्या बहिणाबाईपासून मिसेस फरार, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे यांच्यापासून ते आजच्या विद्या बाळ, डॉ.अश्विनी धोंगडे, डॉ. विद्युत भागवत, डॉ. अनुराधा गुरव ते डॉ.प्रतिमा इंगोलेपर्यंत. तसेच फुल्यांच्या शाळेतील मुक्ता मोरेपर्यंत, दुर्गा भागवत, इरावती कर्वे यांच्यापासून ते गौरी देशपांडे यांचेपर्यंत हे क्षितिज विस्तारत गेले. स्त्रीला स्वत:चे स्वतंत्र स्थान मिळावे म्हणूनर प्रयत्न करणाऱ्यामध्ये पुरुषांचाही सिंहाचा वाटा आहे. महर्षी कर्वे, फुले, आगरकर आदी पुरुषही स्त्रीवादीच होते. कृतीने त्यांनी स्त्रीवाद अंमलात आणला होता.

आपल्याकडे आता ही स्त्रीवादाची चळवळ फोफावली असली तरी स्त्रीला माणूस म्हणून समानता, हक्क हे सारे बुध्दकाळात आपल्याकडे होते असे डॉ. प्रज्ञा लोखंडे 'अनुष्टुभ', आक्टो. ९८ च्या दिवाळी अंकातील लेखात मत मांडले आहे. ''स्त्रीला स्त्री असणे असे लक्षात न घेता, तिला एक विचारशील मानव म्हणूनच मानले पाहिजे असा स्पष्ट उल्लेख त्रिपिटक, अरिया इ. बौध्द धम्मविषयक ग्रंथात आहे.''[९] असे सूर्यमाला जाधव म्हणतात.

स्त्रीत्वाची संकल्पना शरीर भेदांवर न मांडता ती मनोभूमीवर वैचारिक, बौध्दिक क्षमतेवर अवलंबून असावी असेही मत मांडले जाते. साहजिकच परंपरेने स्त्री मनावर जन्मापासून तिच्या मनावर सजवलेला दुबळेपणा, नाजूकपणा, असमर्थपणा म्हणजे स्त्रीत्व नव्हे तर ''मनुष्य म्हणून समाजात

निर्भयपणे वागणे म्हणजे स्त्रीत्व." [१०] असे मत प्रा. डॉ. वसंत नरहर कुबेर यांनी मांडले आहे. थोर-मोठ्या विचारवंतांनी, चिंतन, मनन करुन स्त्रीमुक्तीचा खरा अर्थ शोधलेला आहे. स्त्रीमुक्ती म्हणजे फक्त हक्कासाठी लढणे नव्हे. माणूस म्हणून जबाबदारी टाळणे नव्हे. स्वत:ची जबाबदारी सांभाळून कृती केली पाहिजे. स्त्री मुक्ती म्हणताना पुरुषांना वेठीस धरणे किंवा पुरुषांसारखे राहणे म्हणजे केवळ स्त्रीत्व मिळवणे असे होणार नाही किंवा पुरुषांची संगत नाकारणे असे नव्हे तर परस्परपूरकता हवी. एकमेकांच्या भावनेचा, मनोभूमिकेचा, विचारांचा, विचार करणे. तसेच परस्परांच्या जीवन विकासात अडसर न होता त्याला विकासाची संधी स्वतंत्रता देणे, त्याच्या अस्मितेला तडा न जाऊ देता, उलट त्याचा आत्मविश्वास वाढवणे. या साऱ्या गोष्टी परस्परांनी एकमेकांसाठी करणे म्हणजे दोघांनी एकमेकांना माणूस म्हणून लेखणे असा अर्थ होतो. इथे श्रेष्ठ, कनिष्ठ, स्त्री-पुरुष असा भेद होणार नाही. आपल्या कुवतीनुसार प्रत्येकाला कार्यकुशलता दाखवण्याची संधी, स्वतंत्रता मिळणे म्हणजे मानवता होय.

स्त्रीला दुबळे समजून, तिच्या शरीरावर अत्याचार होत राहिले. परिणामी ती व्यवहारात, विचारात, निर्णयात दुसऱ्यावर अवलंबून राहण्याचे तिच्या मनाला वळण लागले गेले. तिच्या कार्याला आपोआपच दुय्यमत्व मिळत गेले. या साऱ्यातून तिची स्वत:चीच तशी मानसिकता घडत गेली. जेव्हा ती जागी झाली तेव्हा खूप काळ लोटला होता. काळाच्या पडद्यावरचे तिचे अस्तित्व धूसर, पुसट, काळवंडलेले तिला जाणवले. त्या अंधारातून बाहेर पडण्याची तिची धडपड चालू झाली. पण अजूनही ती चाचपडतेच असे दिसते. स्वत:ची जागा नक्की करताना तिला वेगळ्याच समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यांच्या मूकपणाला वाचा फुटली शब्दरुपाने. तिचे दडपलेले अंत:करण उफाळून वर आले. एवढे सारे झाले तरी "स्त्री एका अर्थाने सुशिक्षित आहे पण सुरक्षित नाही. बुध्दिमान, कर्तृत्ववान असली तरी भयमुक्त नाही." [११] असे मत प्रा. डॉ. वसंत नरहर कुबेर (कराड) यांनी व्यक्त केले आहे.

घरातील काम करणे म्हणजे दास्यत्वाचे काम संबोधले गेले. मुलांना जन्म देणे म्हणजे ती मुले तयार करण्याचे जणू मशीन, असा रुढार्थ व संकेत निर्माण झाला. त्या कामामागील, त्या मातृत्वामागील तिचा त्याग, वेदना, तिची मानसिकता, तिचा विचार, तिचे मत यांना गौणत्वच मिळाले आणि मग जेव्हा स्त्रियांना या सर्व गोष्टींची कल्पना आली, तेव्हा त्यांनी आवाज उठवला. पण ते लादले जाऊ लागले. चूल व मूल या कामा व्यतिरिक्त तिचे दुसरे क्षेत्र नाहीच हा समज चुकीचा आहे, हे ती सिध्द करु लागली. मातृत्व व घरकाम या व्यतिरिक्त इतर अनेक क्षेत्रात संधी मिळताच ती काम करु शकते असा दावा करू लागली.

पण अजूनही स्त्री हुंडाबळी आहे. विधवा म्हणून एकाकी आहे. कुठे बाल हत्या आहे. कुठे जन्माआधीच बळी जाते. या साऱ्या मागे तिला समाजाने दिलले दुय्यमत्वच आहे असे म्हणावे लागते. आणि म्हणूनच ती बंड करुन उठली आहे. ''स्त्रीमुक्ती हे एक बंड आहे, पण ते केवळ मूर्तिभंजक, विध्वंसक स्वरूपाचे ठरु नये'' असे मत रा. ग. जाधव मांडतात.

गौरी देशपांडे यांच्या साहित्यातील स्त्री ही अशीच स्त्रीवादाचा पुरस्कार करणारी आहे. गौरी देशपांडे या मूळातच स्त्रियांसाठी सुधारणा करणाऱ्यांचा वारसा घेऊन जन्माला आल्या होत्या. त्यांच्या पिंडातच स्त्रीवादाची बीजे, रुजलेली होती. त्यांच्या साहित्यातील स्त्री ही आत्मभान आलेली, शिक्षणाने प्रगल्भता लाभलेली, उच्चशिक्षित, नोकरी करुन आर्थिकदृष्ट्या सबळ असलेली अशी आहे. तरीही एवढ्याने ती पूर्ण माणूस म्हणून स्वत:ची ओळख पटवू शकते का ? असा प्रश्न पडल्याशिवाय रहात नाही. तिला स्वत:ला स्वत:ची ओळख पटली आहे. माणूस म्हणून तिला जगायचे आहे. त्यांनी चितारलेली स्त्री ही भावनेपेक्षा बुध्दिवादाचा पुरस्कार करणारी आहे. इतर स्त्री प्रमाणे नाजूक, हळवी, भावमधुर, लाजरी, साड्या-दागिन्यांची हौस असणारी कुठेही भेटत नाही. त्यांची नायिका परदेशी आचारविचार जोपासणारी असल्यामुळे कुटुंब संस्था, विवाह संस्था या चाकोरीतून बाहेर पडलेली आहे. भारतीय साचेबंधपणा, बंधनाची चौकट सोडून बाहेर डोकावणारी आहे. हे असे मुक्त जीवन जगताना ,ती मद्यपानही करते. एका पतीशी पटत नाही म्हणून तडजोड करुन तिथेच न राहता दुसऱ्या पुरुषाशी लग्न करणारी आहे. म्हणजेच काळाच्या पुढे गेलेली, धीट आहे.

त्यांची नायिका जवळून बघताना संधीचे सोने करणारी आहे याची जाणीव होते आणि हेच गौरी देशपांडे इच्छितात. संधी मिळताच सत्ता मिळवून आदर मिळवता येतो पण तो अभावानेच आजवर स्त्रीच्या वाट्याला आला आहे हे त्या जाणून आहेत. स्त्रीचा आत्मविश्वास वाढण्यासाठी तिला संधी, सत्ता मिळावयालाच हवी असेच त्यांना सांगायचे आहे. स्त्री कर्तव्यदक्ष, प्रामाणिकपणे आपले कर्तृत्व सिध्द करु शकते. पण तेच काही पुरुषांना नको असते. तिचा वरचढपणा त्याला आवडत नाही. स्त्रीचे वर्चस्व तो सहन करु शकत नाही. स्त्री मात्र आजवर घरातील सारी कामे निमूटपणे करीत आली. तिच्या कामाला पैशात मूल्य नाहीच वर ते हलके समजण्याची प्रवृत्ती सर्वत्र आहे. पण तिचे तेच काम अमोल आहे. त्याकामाची पैशात बरोबरी करता येणार नाही असे जर सर्वांना वाटले तर स्त्री दुय्यम किंवा तिचे काम हलक्या दर्जाचे होणार नाही. हेच समाजमनावर ठसवण्याचा अनेक लेखिकांचा प्रयत्न आहे. त्यापैकी गौरी देशपांडे या एक आहेत.

मातृत्वक्षमता निसर्गदत्त असते पण त्याचा लाभ घ्यायचा की नाही हे ठरविताना स्त्रीचाही विचार घेणे महत्वाचे आहे. उत्खनन मधील मणी हे मातृत्व नाकारते आहे. विश्वाचा विचार करण्याची तिची प्रतिमा आपल्याला उदात्त वाटते. तिने संकुचित मी – माझ्यापुरती हे वलय सोडून बाहेर प्रवेश केला आहे. तिला स्वत:मधील गुणांची जाणीव मोठ्या तीव्रतेने झालेली आहे .

गौरी देशपांडे यांच्या नायिका स्वत:ला मी माणूस आहे, माझा व्यक्ती म्हणून स्वीकार व्हावा अशी अपेक्षा करणाऱ्या आहेत. त्या स्त्री व पुरुष हा भेद मानत नाहीत. मानसिक पातळीवर समानता मानणारी त्यांची नायिका दिसते. तिचे आचार, विचाराबरोबरच पेहरावही तिला आवडेल, पटेल तसाच करते.

पुरुषांनी तिचे बरोबरचे स्थान गेले कित्येक वर्षे नाकारले. वस्तूवत मानून तिच्या पंखातले बळ कमी केले. त्यामुळे तिच्या भरारीचे आकाश मर्यादित राहिले. या जाणिवेने पुरुष प्रवृत्तीला दिलेला हा जोरदार तडाखा आहे.

उत्खननमधील नायिका दुनिया ही व्यक्ती, माणूस म्हणूनच स्वत:कडे बघते. उच्चशिक्षित नोकरी करणारी, आर्थिक स्वतंत्रता असलेली आहे. मद्यपान करणारी आहे. इथेही भेदाच्या भिंती नाहीत. लग्नाअगोदर मातृत्वाचा स्वीकार करणारी आहे. समाजाशी संघर्ष करुन स्वत:च्या मन–बुध्दिचा आवाज ऐकणारी आहे. एवढे सगळे करताना तिचा मित्र तिच्याकडे मातृत्व सोपवून, जबाबदारी टाळून निघून गेला तरीही त्याच्याविरुध्द चीडचीड व्यक्त न करता त्याला समजून घेते. एवढेच नव्हे तर आयुष्याच्या शेवटच्या वेळी त्याला वाचवण्याचा प्रयत्न करते. म्हणजे इथेही ती इतर स्त्री पेक्षा वेगळी असल्याचे जाणवते.

दुनिया अगदी सुरवातीलाही तिच्या विषयी असणाऱ्या आईच्या व वडिलांच्या अपेक्षा न पूर्ण करता स्वत:च्याच मनाप्रमाणे पुरातत्वशास्त्राचे आपले शिक्षण पूर्ण करते. म्हणजे ही नायिका व्यक्ती स्वातंत्र्य सांभाळणारी आहे असे दिसते. फक्त आपल्याच व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार करणारी नाही तर व्यक्ती म्हणवताना पतीच्याही स्वातंत्र्यात अडथळा आणणारी नाही. पहिला अनंता त्याच्यावरही स्वत:चे कोणते मत लादत नाही. व नंतर दयाळवरही कोणतेही मत न लादता, त्याच्यापासून काहीही न लपवता स्वत:चे मन उघडे करते. मी आहे ही अशी आहे हाच तिचा अविर्भाव असतो. स्त्री म्हणून भावनांच्या कोंदणात स्वत:ही अडकत नाही व त्यालाही गुरफटण्याचा प्रयत्न करताना दिसत नाही. स्त्री आहे तत्पूर्वी प्रथम मी माणूस आहे, हाच तिचा दावा आहे व हेच तिचे वेगळेपण आहे. गौरी देशपांडे अशीच स्त्रीची भूमिका स्त्रीवादाच्या स्वरुपात सांगू इच्छितात.

व्यक्तिस्वातंत्र्याचा अनुभव स्वत: घेणाऱ्या आईची मुलगी मणी ही उत्खनन मधील व्यक्तिरेखा आहे. बालपणापासून स्वतंत्र मत मांडण्याची तिच्या मनाला, विचारांना वळण आहे. उच्चशिक्षण घेऊन न्यूरोसर्जन झालेली अत्यंत बुध्दिवादी आहे. जब्बारशी लग्न करते पण त्यानंतरचे मातृत्व नाकारते. करिअरपुढे संसार, कुटुंब, पती, मुले हे काहीच तिला नको आहे. म्हणजे हे सारे तिला लादून घ्यायचे नाही. तिच्या मनात ममता आहे पण ती स्वत:च्या मुलापुरती वापरायची नाही. विश्वातील मुलांसाठी उपलब्ध करुन द्यायची आहे. त्यासाठी ती नवऱ्यापासून विभक्त होते. पण स्वत:चे करिअर, कर्तव्य, कर्म, मनाशी प्रतारणा करत नाही. कसलीही तडजोड करत नाही. आपला आत्मसन्मान आपले जीवनाचे तंत्र, याच्या आड कोणासही येऊ देत नाही. गौरी देशपांडे यांच्या साहित्यातील हाच विषय वेगळेपण दर्शवतो.

आजवर स्त्रीला छोट्या-छोट्या गोष्टींसाठी झगडावे लागत होते. पण आता काळ पुढे सरकला. त्याचा नूर पालटला आहे. आणि स्त्री सजग झाली आहे. आता त्याच्यापुढे जाऊन तिला आपले जीवन उदात्त असावे असे वाटू लागले आहे. पूर्वी ती कुटुंबात मला स्थान नाही म्हणून रडत होती. आता समाजात स्थान पक्के करण्यासाठी झगडत आहे आणि म्हणून सर्वसामान्य स्त्रीपेक्षा वेगळी असणारी ही नायिका आज जरी आपली प्रत्येकाची वाटत नसली तरी आपलेच प्रतिनिधित्व करते आहे .

मुलाला जन्म दिला तर त्याच्या ममत्वात, संगोपनात अडकून रहावे लागेल. सर्वसामान्य, सर्वत्र हे चित्र दिसतेच व त्या स्त्रियांनाही ती कमी लेखत नाही. पण माझ्या पंखात थोडे जास्त बळ आहे, मी अजून जरा मोठी, उंच, झेप घेऊ शकते. ती घेताना मला ममत्वात अडकून राहणे परवडणारे, पटणारे नाही. तेव्हा ते नाकारले तर बिघडले कुठे ? अशीच मणीची मनोभूमिका आहे. तिच्याकडे वात्सल्य आहे पण स्वत:पुरते न वापरता इतरांसाठीची खर्च करण्याची तिची इच्छा आहे. हेच तिचे रूप तिच्या पतीला विदारक वाटते. कुवत असेल तर एकमेकांनी एकमेकांना संधी देणे, त्यांच्या प्रगतीच्या मार्गाआड न येणे हे सहचारी म्हणून प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे असे म्हणता येईल. केवळ मूल नको या कारणावरुन तिला पती, संसार या साऱ्यांना मुकावे लागेल. हा तिचा त्याग जब्बारला उदात्त का वाटू नये. म्हणजे तो ही मूल होणे, त्याला सांभाळत स्त्रीने जीवन खर्च करणे एवढेच तिचे कार्य मानणाऱ्यातला आहे. जब्बारची विचारधारणा तोकडी आहे. गौरी देशपांडे यांची नायिका स्वत:च्या जीवन ध्येयासाठी, आत्मसन्मानासाठी, स्वत:ला माणूस म्हणून सिध्द करण्यासाठी, सामाजिक पातळीवर कुटुंबाचा त्याग करणारी आहे. आणि ते ही निर्भिडपणे. रडत, कुढत, भांडत नव्हे. हेच तिच्या स्त्रीपणाचे यश आहे .

पुराणकाळापासून इतिहासातही आपण बघतो. स्त्रीने अनेकदा संधी मिळताच, प्रसंगी जबाबदारी कर्तव्य समजून आपल्या कर्तृत्वाचे ठसे उमटवले आहेत. अति अल्प वयात नाजुकपणा बाजूस सारुन दुबळेपणा झटकून लक्ष्मीबाईचे तलवार धरणारे हात स्त्रीचे नव्हते का ? सावित्रीबाई फुले, कस्तुरबा गांधी, यांच्या सारख्या अनेक स्त्रिया संधी मिळताच चळवळीत सक्रिय भाग घेणाऱ्या स्त्रिया आहेतच की. मेरी क्युरी व पिअर क्युरी यांच्यामध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ कोणाला ठरविता येईल ? आता अलिकडे तर स्त्रीया पुरूषा बरोबर अवकाशात झेप घेत आहेत. कल्पना चावलाचे योगदान काय पुरूषां पेक्षा कमी आहे ? किरण बेदी यांच्या सारख्या स्त्रीयांची कर्तव्यदक्षता, कामावरील निष्ठा वंदनिय आहे. म्हणजेच काळाच्या प्रवाहात, प्रत्येक वळणात, प्रत्येक क्षेत्रात स्त्री आहेच.

मान्य आहे की निसर्गाने, नियतीने, निर्मात्याने तिच्याकडे मातृत्व सोपवले आहे. विश्वनियंत्याने सोपवलेली जबाबदारी नक्कीच कमी दर्जाची नसणार ! तिची कुवत, क्षमता, शक्ती, ओळखूनच एवढे महान कार्य तिच्यावर सोपवले असेल हे मान्य करावेच लागते. मग ते किंवा तिचे इतरही कार्य हीन मानणारे आपण कोण? उलट स्त्री ही भगवंताची 'उत्कृष्ट कलाकृती आहे' असे तज्ञांचे, विचारवंताचे मत आहे.

स्त्री व पुरुष एकमेकांसाठी एकमेकांच्या जीवन विकासासाठी, निर्मात्याने निर्मिलेली दोन घटक (पात्रे) आहेत असे मानावे लागते. स्त्रीला दुर्बल, हीन मानणे, तिला लाचार बनवणे, तिचा आत्मविश्वास कमजोर करणे, तिचे वैचारिक बौध्दिक बळ दडपणे, या गोष्टींमध्ये मानवी जीवनाचा विकास नव्हे, अधोगतीचे घसरणारे पाऊल आहे असे म्हटले तरी चालेल. परस्परांच्या गुणांचे वर्णन करणे, एकमेकांसाठी काही गोष्टींबाबत त्यागाची भावना असणे, आत्मसन्मानाची, परगौरवाची जाणीव ठेवणे, अशा सामोपचाराने स्त्री व पुरुष जीवन जगू लागले तर मानवी जीवनाचा विकास माणूस म्हणून करता येणे शक्य आहे.

हाच स्त्रीवाद गौरीताईंना अपेक्षित असावा. कारण त्या स्वत:चे स्त्री म्हणून माणूसपण सांभाळताना आत्मगौरव राखतात. पण तेव्हा त्या कोणत्या पुरुषाची मानहानी, तो कनिष्ठ आहे, त्याची माझ्या जीवनात गरज नाही असे वर्तन त्यांची नायिका करत नाही. तू जसा माणूस आहेस तशीच मी ही माणूसच आहे. मग स्त्री की पुरुष हे नंतर असे असता हीनत्व, लाचारी, नाहीच. शिवाय स्त्री म्हणून दुबळेपणा, फक्त शरीर शृंगारणे किंवा स्त्री म्हणून उगीचच कोणत्याही फायद्याची अपेक्षा करणे याही गोष्टी त्यांची नायिका करत नाही.

स्त्रीवाद म्हणजे हट्टाने पुरुषी गुण जोपासणे नव्हे तर मला जे पटेल, रुचेल, जमेल ते मी ही करु शकते हा भाव दिसतो. त्यांच्या उत्खनन मधील नायिका दुनिया अल्पवयात मातृत्व देणारा पुरुष नसताना मातृत्वाची जबाबदारी नाकारत नाही कारण ते मला माझ्या कुटुंबाला मान्य आहे. मग इथे समाज काय म्हणेल ? समाजाच्या उमटलेल्या प्रतिक्रियेचा परिणाम ती आपल्या मनावर, जीवनावर होऊ देत नाही. संघर्षासाठी तयार होते. हे हक्क किंवा आडदांडपणा म्हणूनही नाही. पण जे मला मान्य ते मी स्वीकारणार, कारण तो माझा वैयक्तिक प्रश्न आहे. व मी व्यक्ती आहे असाच तिचा आविर्भाव आहे.

त्यांच्या कादंबरीतील दुसरे स्त्री चित्रण दुनियाची कन्या मणी. हिच्या पतीला जब्बारला ती कुटुंबवत्सल, घरेलू, स्त्री रुपात हवी आहे. पत्नी म्हणून तिने आपल्या बाळाची आई व्हावे अशी तो अपेक्षा करतो. पण मणीला ते मातृत्व नको आहे. माझ्या मनाला, बुध्दीला, विचारांना जे पटेल तेच मी स्वीकारणार. स्त्री म्हणून कोणी काही लादावे, मी ते उचलणार नाही. आणि यासाठी मी कोणाशीही म्हणजे, कुटुंबाशी किंवा समाजाशी ही संघर्षाची तलवार हाती धरणारी आहे. स्त्रीवादाचं हेच रुप गौरी देशपांडेंनी आपल्या नायिकातून साकार केले आहे.

माझ्या जीवनामध्ये पुरुषाला स्थान नाही असे नाही किंवा मला पुरुषांशिवाय जीवन जगायचे आहे असेही नाही. नियतीने या दोघांना एकमेकांसाठी निर्माण केले आहे हे मलाही मान्य आहे. पण पुरुषामधील पुरुषी अहं, जो स्त्रीला कमी लेखतो, हीनत्व देतो, मनाविरुध्द तिच्यावर अनेक गोष्टी लादतो. हे सारे करताना स्वत:ला श्रेष्ठ समजतो. हा पुरुषी हेका मान्य नाही. परस्परांकडे बघण्याची निर्भेळ, निकोप दृष्टी जी मानवाला मानवता देते. समानता देते, सन्मान देते ती हवी आहे. अशी आहे गौरीताईंची नायिका. तिची जी विचारधारा तोच त्यांचा स्त्रीवाद !

'' 'स्त्रीवाद' ही संकल्पना, अस्मितेच्या संघर्षातून पुढे येताना दिसते. सर्व स्तरावर स्त्रीला माणूस म्हणून जगण्यासाठी जाणीवपूर्वक केला जाणारा संघर्ष म्हणजे 'स्त्रीवाद' होय.''[१२] अशी स्त्री वादाची व्याख्या प्रा. दिलीप एम. कोने (सातारा) यांनी केली आहे. अशा प्रकारे वैयक्तिक , सामाजिक, आर्थिक व राजकीय पातळीवर होणाऱ्या स्त्रियांच्या दडपणुकीबद्दल, जाणीव होणे आणि त्या दडपणुकी विरुध्द झगडण्याची तयारी म्हणजे स्त्रीवादाचा अंगिकार करणे. अशाच प्रकारचा दृष्टिकोन गौरी देशपांडे यांनी आपल्या कादंबरीत मांडला आहे.

**सारांश**

तात्पर्य, गौरी देशपांडे यांनी मराठी साहित्यात आपला जो कादंबरी प्रपंच मांडला त्यातील 'उत्खनन' ही त्यांची अखेरची कादंबरी आहे. 'स्त्रीवादी' या विशेषणाने संबोधल्या गेलेल्या या कादंबरीचा वेगवेगळया घटकानुसार शोध-अभ्यास करताना असे आढळते की, लेखिकेने या लघुकादंबरीत स्त्री जीवनाचे तिच्या भावभावनांचे उत्खनन केलेले आहे.

स्त्री समाज या घटकाला आपल्या जीवनात केवढे स्थान देते ते तिच्या व्यक्तिगत जीवनात तिने घेतलेल्या भूमिकेत प्रतीत होते. मात्र 'उत्खनन' मधील आशयातून लेखिकेने स्त्री आणि समाज या दोन्ही घटकास अंतर्मूख होण्यास प्रवृत्त केलेले आहे. या कादंबरीची नायिका 'दुनिया' नावाची आहे. कुमारीमाता होण्याची चिन्हे दिसू लागताच नायक अनंता परागंदा होतो. इथपर्यंत परंपरेला थोडे परिचित कथानक येते. नंतर मात्र दुनियाचे आईवडिल व दुनिया एकमेकांच्या संमतीने येणा-या बाळाला स्वीकारायचे ठरवतात. हा निर्णय समाजप्रवाहाच्या विरोधी असतो. या प्रसंगी घर विकण्याचा प्रस्ताव मांडला जातो तेव्हा 'उत्खनन' च्या मूळ आशयाला प्रारंभ होतो. प्रत्येक प्रश्नाला उत्तर सापडते तसे चुकांकडे भयाने पाहून जबाबदारीपासून पळ काढून जीवन फलदायी होत नाही. हे समजून आलेल्या परिस्थितीला सामोरे जाण्यातच जीवन जगणे असते. असा जीवनविषयक लेखिकेचा उदात्त दृष्टिकोन कादंबरीच्या माध्यमातून पुढे येतो.

या कादंबरी लेखिकेने दोन कुटुंबांना एका वर्तुळात आणून कथानक वजनदार केले आहे. नायिका कुमारी माता तिला दुसरा मित्र लग्नाची मागणी घालतो तेव्हा ती स्वत:च्या आवडी बरोबर घरच्यांच्या आवडीचा आग्रह धरते. येथे असे दिसते की, प्रचलित समाजात एखादा प्रेम करणारा मुलगा जसा आपल्या आवडीबरोबर जसा आपल्या कुटुंबीयांच्या आवडीलाही 'तू उतरली पाहिजेस तर मी तुझ्याशी लग्न करीन' असे म्हणतो तसाच अर्थ या प्रसंगात दडला आहे. सुखदु:खाचे सहित, गुण-दोषांसकट एकमेकांना स्वीकारायचे ते ही एकमेकांच्या कुटुंबियासह अशी ही भूमिका ठेवून लेखिकेने कादंबरीचे स्त्रीवादी मूल्य वाढविले आहे.

# संदर्भ सूची


१) नीलिमा पालवणकर, गौरी देशपांडे विशेषांक, २००३ ऑगस्ट, मिळून साऱ्याजणी, मौज प्रकाशन, पुणे, पृ. ९९.

२) गौरी देशपांडे, 'उत्खनन', मौज प्रकाशन, मुंबई २००२, प्रथमावृत्ती, पृ. ४०.

३) उनि. पृ. ४७.

४) उनि. पृ. ९५.

५) बाल शंकर देशपांडे, 'कादंबरी : विवेचन आणि विश्लेषण', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, पृ.२७.

६) नीलिमा पालवणकर, गौरी देशपांडे विशेषांक, २००३, मिळवून साऱ्याजणी, मौज प्रकाशन, पुणे, पृ.९९.

७) बाल शंकर देशपांडे, 'कादंबरी : विवेचन आणि विश्लेषण', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, पृ.४५.

८) गौरी देशपांडे, 'उत्खनन', मौज प्रकाशन, मुंबई २००२, प्रथमावृत्ती, पृ. ४९.

९) सूर्यमाला जाधव, 'विचार भारती' 'स्त्रीवादी संकल्पना आणि मराठीतील स्त्रीवादी साहित्य विशेषांक', जून – जुलै २००४, अंक – २, वर्ष – ३४ वे, पृ. ४०.

१०) डॉ. वसंत नरहर कुबेर, 'विचार भारती', 'स्त्रीवादी संकल्पना आणि मराठीतील स्त्रीवादी साहित्य विशेषांक', जून – जुलै २००४, अंक – २, वर्ष – ३४ वे, पृ. ४३.

११) उनि. पृ. ४५.

१२) प्रा. दिलीप एम. कोने, 'विचार भारती', 'स्त्रीवादी संकल्पना आणि मराठीतील स्त्रीवादी साहित्य विशेषांक', जून – जुलै २००४, अंक – २, वर्ष – ३४ वे, पृ. ८४.